# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड गुरुवार । दि. ३० जुलै २०२६ । अंक ५४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


### जातवैधतेसाठी १२ महिन्यांची मुदत

**मुंबई :** ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना आता १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक होणार आहे. यासाठी संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करून अध्यादेश काढण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

### परीक्षा गैरव्यवहारावर कठोर कारवाई

**नवी दिल्ली :** परीक्षांमधील पेपरफुटी, कॉपी, तांत्रिक गैरव्यवहार आणि संघटित फसवणुकीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आणलेले परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. दोन दिवसांच्या चर्चेनंतर विरोधकांच्या गदारोळात हे विधेयक मंजूर झाले. या कायद्याच्या कक्षेत नीट-यूजी, जेईई-मेन, यूजीसी-नेट, सीयूईटी, यूपीएससी, एसएससी, रेल्वे भरती मंडळ आणि आयबीपीएस यांसह केंद्र सरकारच्या विविध सार्वजनिक परीक्षा व भरती परीक्षांचा समावेश आहे.

## वेधक

### रायगडला मुसळधार पावसाचा इशारा

**रायगड :** कोकण किनारपट्टीलगत अरबी समुद्रात चक्रीवादळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने रायगडसह कोकणात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असून, किनारपट्टी भागात सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. या काळात ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची आणि समुद्रातील लाटांची उंची चार मीटरपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे मच्छिमारांनी पुढील काही दिवस समुद्रात जाऊ नये, तसेच किनारपट्टीवरील नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### एसटी स्मार्ट कार्डची मुदत वाढली

**मुंबई :** एसटी प्रवासातील विविध सवलतींसाठी स्मार्ट कार्ड १ ऑगस्टपासून अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य सरकारने पुढे ढकलला आहे. आता या निर्णयाची अंमलबजावणी १ सप्टेंबरपासून करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्यातील अनेक पात्र ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी अर्ज करूनही त्यांना अद्याप कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे पात्र प्रवाशांना सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यान, स्मार्ट कार्ड काढण्यासाठी बसस्थानकांवर गर्दी होत असून, प्रवाशांनी मुदतीपूर्वी कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खारबंदिस्तीची चाळण, कोट्यवधींची उधळण

- मंत्र्यांच्याच जिल्ह्यात खारभूमी योजनेचा बोजवारा?
- पेणमधील खारबंदिस्तीवर भ्रष्टाचाराचे आरोप
- भरतशेठ आता तरी भ्रष्टाचाराविरुद्ध रुमाल फिरवणार का?



**संतोष पाटील**

**। पेण ।**

राज्याचे खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांच्या स्वतःच्या रायगड जिल्ह्यातच खारभूमी विकास योजनेतील कामांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पेण तालुक्यात सुरू असलेल्या चार खारबंदिस्ती योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत असून, विशेषतः दुतर्पा-कोपर खारबंदिस्ती हे काम वादाच्या केंद्रस्थानी आले आहे.

सुमारे ५ कोटी ८० लाख खर्चाच्या या योजनेत आतापर्यंत ४ कोटी ३१ लाखांचे बिल अदा करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात काम मंजूर आराखड्यानुसार झालेले नसल्याचा आरोप आहे. नियमानुसार खारबंदिस्तीचा पाया १२ मीटर, उंची ४ मीटर, माथ्याची रुंदी ३ मीटर, दोन्ही बाजूंनी दगडी पिचिंग आणि माथ्यावर एक फूट मुरुमाचा थर आवश्यक असतानाही या निकषांचे पालन करण्यात आले नसल्याचे प्रथमदर्शनी घटनास्थळी दिसत आहे. तसेच सुमारे चार किलोमीटरच्या बंदिस्तीमध्ये अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात खांडी पडल्याचे, बांधावरून पाणी आरपार जात असल्याचे आणि त्यामुळे कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाल्याचे आरोप आहेत. या कामाचा मूळ ठेका स्वामी समर्थ इंजिनिअरिंग, पुणे या कंपनीकडे असून, पान २ वर

#### दोषींवर कारवाईची मागणी

खारभूमी विकास मंत्र्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यातच अशा प्रकारचे गंभीर आरोप होत असतील, तर राज्यातील इतर भागातील कामांची गुणवत्ता आणि देखरेख याबाबतही प्रश्न निर्माण होत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांसह दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकाकडून होत आहे. दरम्यान, या प्रकरणातील सर्व आरोप संबंधितांकडून नाकारले जाऊ शकतात. त्यामुळे शासनाने निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे, हीच काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे

## महाराष्ट्रात मासेमारी बंदी; परराज्यांच्या बोटींना मोकळे रान?

- मत्स्यसंवर्धनासाठी देशभर एकच कायदा करा
- मच्छिमार संघटनांची मागणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राच्या सागरी जलहद्दीत पावसाळी मासेमारी बंदी असताना गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूतील बोटी मात्र मासेमारीसाठी समुद्रात उतरणार असल्याने महाराष्ट्रातील मच्छिमारांमध्ये संताप आहे. एका राज्यात बंदी आणि दुसऱ्या राज्यात मासेमारी सुरू, अशी विसंगती असल्याने मत्स्यसंपदेच्या संवर्धनाचा उद्देशच फोल ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरील सर्व राज्यांसाठी पावसाळी मासेमारी बंदीचा एकच समान कायदा लागू करावा, अशी मागणी मच्छिमार संघटनांनी केली आहे.

महाराष्ट्रात यंदा मासेमारी बंदीचा कालावधी ६६ दिवसांवरून वाढवून १५ ऑगस्टपर्यंत ७५ दिवस करण्यात आला आहे. या काळात राज्याच्या १२ सागरी मैलांच्या जलहद्दीत मासेमारीला बंदी आहे. मात्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडूमध्ये १ ऑगस्टपासून मासेमारी सुरू होणार असल्याने परराज्यातील बोटी महाराष्ट्राच्या जलहद्दीत घुसखोरी करण्याची भीती व्यक्त होत आहे. महाराष्ट्र मच्छिमार पान २ वर

> “रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, मुंबई व उपनगर, पालघर आणि ठाणे या सागरी जिल्ह्यांसाठी असलेल्या पाचही गस्ती नौका पावसाळी बंदीच्या काळात सुरक्षिततेसाठी किनाऱ्यावर ठेवण्यात आल्या आहेत. १५ ऑगस्टनंतर परराज्यातील बोटींवर कारवाई करण्यासाठी कोस्टगार्डची मदत घेतली जाईल.”
>
> – महेश देवरे, सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग

## शेकापच्या वर्धापन दिनासाठी खालापूर सज्ज

**दहा हजार कार्यकर्त्यांसाठी भव्य सभामंडपाची उभारणी अंतिम टप्प्यात**



**। खालापूर । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या २ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वर्धापन दिन सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली असून, या पार्श्वभूमीवर पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार जयंत पाटील, मा. आमदार बाळाराम पाटील आणि रायगड जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी आयोजन समितीसह प्रत्यक्ष सभा स्थळाची पाहणी करून आयोजनाचा आढावा घेतला. राष्ट्रीय महामार्गालगत जुन्या राशी पेट्रोल पंप परिसरात उभारण्यात येत असलेला भव्य सभा मंडप पाहून त्यांनी विविध समित्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आयोजकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात असून, सुमारे दहा हजार कार्यकर्त्यांसाठी प्रशस्त आसनव्यवस्था करण्यात आली आहे. सभास्थळी येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग, पत्रकारांसाठी विशेष कक्ष, तसेच एलईडी स्क्रीनद्वारे संपूर्ण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण, अशी अत्याधुनिक व्यवस्था उभारण्यात येत आहे. कार्यक्रमाचे नियोजन अधिक सुसूत्र आणि शिस्तबद्ध व्हावे यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून, प्रत्येक समिती आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडत आहे.

२ ऑगस्टचा हा वर्धापन दिन केवळ पक्षाचा वार्षिक सोहळा नसून शेतकरी कामगार पक्षाच्या पुरोगामी विचारांचा, संघर्षशील परंपरेचा आणि जनतेच्या प्रश्नांप्रती असलेल्या बांधिलकीचा एल्गार ठरणार असल्याचे कार्यकर्त्यांमध्ये वातावरण आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो कार्यकर्ते खालापूरमध्ये दाखल होणार असून, लालबावट्याच्या साक्षीने विचारांची ताकद पुन्हा एकदा महाराष्ट्रासमोर उभी राहणार आहे. पान २ वर

## महामार्गांवरील अतिक्रमणांना सर्वोच्च न्यायालयाचा ‘बुलडोझर’!

- ६० दिवसांत एकही बेकायदेशीर बांधकाम शिल्लक ठेवू नका
- जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांवर थेट जबाबदारी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय महामार्गांवरील अतिक्रमणांमुळे वाढणारे अपघात आणि वाहतुकीला निर्माण होणारे अडथळे यांची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठा दणका दिला आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे ६० दिवसांत पूर्णपणे हटविण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

या कारवाईची थेट आणि वैयक्तिक जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे अतिक्रमण हटाव मोहिमेत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाईची टांगती तलवार राहणार आहे.

१३ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर राज्य सरकारने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी २२ जुलै रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून युद्धपातळीवर अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. पान २ वर

#### प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र पथक

अतिक्रमण हटावासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ‘जिल्हा महामार्ग सुरक्षा पथक’ स्थापन करण्यात येणार आहे. यात महसूल, पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी सहभागी असतील.

## मिठागरमधील कांदळवन प्रकरणाबाबत चालढकल

**सामाजिक कार्यकर्ते महेश ठाकूर यांचा आरोप**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यातील मिठागरमध्ये बेकायदेशीररित्या कांदळवनाची कत्तल करण्यात आली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्यासह मुरूड तहसीलदार यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली. मात्र, ठोस कारवाई न करता, चुकीचे पंचनामा करून प्रशासनाकडून चालढकल केली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश ठाकूर यांनी केला आहे. पान २ वर

> “मिठागरमधील कांदळन तोडीबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागविण्यात आली. याबाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कांदळवन अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रार करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरापासून पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली नाही. फक्त कागदी घोडे नाचविण्याचे काम त्यांनी करून कारवाईकडे दुर्लक्ष करीत आहेत. कांदळवन अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी चुकीचे पंचनामे करून शासनाची दिशाभूल केली आहे.”
>
> – महेश ठाकूर

### रिक्षा पलटी; चालक, प्रवासी जखमी

**। नवीन पनवेल । वृत्तसंस्था ।**

रिक्षा पलटी झाल्याने रिक्षातील चालक आणि प्रवासी जखमी झाल्याची घटना उरण ते पनवेल रोडवर पुष्पक नगर समोरील ब्रिजच्या शेजारी घडली. या अपघाताप्रकरणी व्हॅगनार कार चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २६ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील व्हॅगनार कारवरील आरोपी चालकाने रिक्षा क्रमांक एमएच ४६ एझेड ८७८६ ला मागून येऊन धडक दिली. या अपघातात रिक्षा पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात रिक्षा चालक फिरोज कादिर शेख हा जखमी झाला, पान २ वर

## सलाम ‘ऑस्कर’!

**१९४ गुन्ह्यांच्या तपासात बजावली मोलाची भूमिका**



**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

गणवेश नव्हता, बोलता येत नव्हते; मात्र कर्तव्याची जाण आणि गुन्हेगारांचा माग काढण्याची विलक्षण क्षमता होती. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता रायगड पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून तब्बल सात वर्षे सेवा बजावणारा श्वान पथकातील विश्वासू सहकारी ‘ऑस्कर’ अखेर बुधवार, दि. २९ रोजी काळाच्या पडद्याआड गेला. त्याच्या निधनाने रायगड पोलीस दलाने केवळ एक प्रशिक्षित श्वान नव्हे, तर निष्ठावान सहकारी, विश्वासू मित्र आणि कर्तव्यनिष्ठ योद्धा गमावला आहे.

रायगड पोलीस दलाच्या श्वान पथकातील ऑस्करने आपल्या तीक्ष्ण घ्राणशक्तीच्या जोरावर अनेक गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना मोलाची मदत केली. चोरी, घरफोडी, दरोडे तसेच विविध गंभीर गुन्ह्यांच्या घटनास्थळी मिळालेले सुगावे शोधणे, संशयितांचा माग काढणे आणि तपासाला योग्य दिशा देण्यात त्याची भूमिका अनेकदा निर्णायक ठरली.सात वर्षांच्या सेवाकाळात तब्बल १९४ गुन्ह्यांच्या तपासात ऑस्करने सक्रिय सहभाग नोंदवला. तपासात पान २ वर

## करोडोंची सायबर फसवणूक उघड

- १३ पोलीस ठाण्यांसह सायबर पोलीस ठाण्यात ११ गुन्ह्यांची नोद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

डिजिटल अरेस्ट, शेअर मार्केट अशा डिजिटल माध्यमांद्वारे सायबर फसवणूक करणाऱ्यांविरोधात रायगड पोलिसांनी कारवाई केली. म्यूल बँक खातेधारकांनी आर्थिक लाभासाठी दुसऱ्याला बँक खाती वापरण्यास दिल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी ३५ कोटी रुपयांची सायबर फसवणुकीचे २३ गुन्हे दाखल करण्यात आली आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात १३ आणि सायबर पोलीस ठाण्यांमध्ये ११ गुन्ह्यांची नोंद आहे. सायबर पोलीस ठाण्यामध्ये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे.

कॅशलेसच्या आर्थिक व्यवहारामुळे ऑनलाईनवर अधिक भर दिला जात आहे. जिल्ह्यामध्ये ७० टक्के ऑनलाईन व्यवहार चालत आहेत. मात्र, जिल्ह्यात सायबर गुन्हेगारीच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. सायबर फसवणूक करणारे संगमनत करून अपराध करीत आहेत. दिशाभूल करून आमिषाद्वारे ऑनलाईन फसवणुकीचे संकट वाढले असल्याची बाब रायगड पोलिसांच्या निदर्शनास आली. दुसऱ्याच्या पान २ वर


।। पाचवे पुण्यस्मरण ।।



शेतकरी कामगार पक्षाचे
ज्येष्ठ नेते
स्व. गणपतराव देशमुख
यांच्या स्मृतीस
विनम्र अभिवादन

कृषीवल परिवार

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड
वर्धापन दिन
दिनांक २ ऑगस्ट २०२६

लाल सलाम

भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष सदस्यांचा मेळावा **रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता राशी पेट्रोल पंप, खालापूर फाटा, ता. खालापूर जि. रायगड येथे पक्षाचे सरचिटणीस मा.आमदार भाई जयंत पाटील** व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे. सदर मेळाव्यास पक्षाचे ज्येष्ठ नेते मार्गदर्शन करणार आहेत. तरी पक्ष कार्यकर्त्यांनी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला,
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस
शे.का.प. रायगड-अलिबाग

# मोकळी जागा ठरतेय कचऱ्याचे अड्डे



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

कचरा व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. मात्र हे प्रयत्न पुर्णतः फेल ठरल्याचे चित्र समोर आले आहे. पंधरा वित्त आयोगासह वेगवेगळ्या निधीतून घंटागाडी खरेदी करण्यात आल्या. परंतु आजही जिल्ह्यातील गावे, वाड्यांच्या प्रवेशद्वारासमोर ठिकठिकाणी कचरा अस्ताव्यस्त पडलेला आहे.ग्रामीण भागात कचऱ्याच्या समस्येने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्याच्या कडेला, मैदानावर व मोकळ्या जागेतील कचऱ्यामुळे रोगराई पसरून साथीचे रोग उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

- **गावे, वाड्यांमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात**
- **ग्रामीण भागात कचऱ्याच्या समस्येने नागरिक त्रस्त**

२०११ च्या जनगणनेनुसार रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २६ लाख३४ हजार २०० आहे. त्यामध्ये १३ लाख ४४ हजार ३४५ पुरुष आणि १२ लाख ८९ हजार ८५५ महिलांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार पाच इतकी आहे.त्यामध्ये आठ लाख ३६ हजार ९९६ पुरुष व आठ लाख २७ हजार नऊ महिलांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी वेगवेगळ्या योजना जिल्हा परिषदेच्या मार्फत राबविल्या जातात. जिल्ह्यामध्ये औद्योगिकीकरण झपाट्याने वाढत आहे. दोन हजारहून अधिक लहान मोठे प्रकल्प आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकीकरणही झपाट्याने वाढत आहे. ग्रामपंचायतींवर लोकवस्तीचा भार वाढत आहे. नागरिकांचे आरोग्य राखण्याबरोबरच त्यांना स्वच्छतेची सवय राहवी, यासाठी जिल्हा परिषद स्वच्छता व पाणी विभागाकडून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. शोष खड्डयापासून कंपोस्ट पीट उभारण्याबाबत जनजागृती करण्यात आली. गावांच्या वेशीवर ही कंपोस्ट पीट बांधण्यात आले. जमा केलेल्या कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट लावली जात नसल्याने नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. जिल्ह्यातील ८१० ग्रामपंचायतीपैकी काही मोजक्याच ग्रामपंचायतींनी पंधरा वित्त आयोग, लोकसहभाग आणि अन्य शासकीय योजनेतून घंटागाडी घेतली आहे. मात्र या कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य पध्दतीने होत नसल्याची बाब समोर आली आहे. रस्त्याच्या दुतर्फा अथवा मोकळ्या जागेत, मैदानामध्ये कचरा टाकण्याचा प्रकार वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यवर त्याचा परिणाम होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. जिल्ह्यात केवळ १६ ग्रामपंचायतींमध्ये कचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यान्वित आहे. अन्य ग्रामपंचायती जागे अभावी हा प्रकल्प उभारण्यास अपयशी ठरले आहेत. बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये डंपिंग ग्राउंड नाही.त्यामुळे जमा केलेला कचरा रस्त्याच्या किनारी, मैदानाच्या कोपऱ्यात, मोकळ्या जागेत अथवा नदी लगत टाकला जात आहे. जमा केलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावायची कशी, असा प्रश्न ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींनाही भेडसावत आहे.

### वायू प्रदुषणाचा धोका

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचा विस्तार वाढत आहे. नागरिकीकरणही झपाट्याने वाढत आहे. मात्र नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कचऱ्यावर प्रक्रीया करणारी यंत्रणेचा अभाव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. जमा केलेला कचरा जाळून टाकण्यावर अनेकजण भर देतात. त्यामुळे वायू प्रदुषणाचा धोका निर्माण होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. कचऱ्याच्या धुरामुळे नागरिकांमध्ये दम्याचे व इतर आजार वाढण्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे. जमा झालेल्या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळेही साथीचे आजार फैलावण्याचा धोका असल्याचे बोलले जात आहे.

## रुग्णवाहिका देण्याची मागणी

**खोपोली :** खालापूर नगरपंचायतीची रुग्णवाहिका गेल्या चार वर्षांपासून खासगी ठेकेदारीवर देण्यात येथील नागरिकांना वेळेवर रुग्णवाहिका सेवा मिळत नसून, रुग्णांचे हाल होत आहेत. त्यामुळे नगरपंचायतीची रुग्णवाहिका तात्काळ खालापूर नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे खालापूर शहराध्यक्ष रोशन खराळ यांनी मुख्याधिकारी कोमल कराळे यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे. सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत एका उद्योगसमूहाने खालापूर नगरपंचायतीला रुग्णवाहिका भेट दिली होती. ही रुग्णवाहिका नगरपंचायत हद्दीतील नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी वापरली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात ही रुग्णवाहिका गेल्या चार वर्षांपासून खोपोलीसह अन्य भागात खाजगी ठेकेदारीवर कार्यरत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# सुडकोलीत तरुणाचा अपघात की घात?

- **कॉरीतील पाण्यात बुडाल्याची घटना**
- **नातेवाईकांनी व्यक्त केला संशय**
- **पोलीस तपासानंतर उलगडा होणार**

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

सुडकोली येथील खडी उत्खननाच्या कॉरीत साचलेल्या पाण्यात बुडून मुंबईतील एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २७) घडली. मात्र, तरुणाचा मृत्यू अपघाती नसून, घातपाताचा प्रकार असण्याची शक्यता असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केल्याने या घटनेचे गूढ वाढले आहे. त्यामुळे हा मृत्यू नेमका अपघात की घातपात, याचा उलगडा आता पोलीस तपासातून होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुडकोली येथील माळी यांच्या मालकीची खडी उत्खननाची कॉरी आहे. या कॉरीमध्ये सध्या पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले आहे. मुंबईतील वडाळा परिसरासह सुडकोली येथील काही तरुण सोमवारी कॉरीजवळ फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी वडाळा येथील एक तरुण कॉरीतील पाण्यात बुडाला. घटनेनंतर त्याला तातडीने बेशुद्ध अवस्थेत अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याचा यापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. दरम्यान, कॉरीतील पाण्यात बुडून तरुणाचा आकस्मिक मृत्यू झाल्याची नोंद रेवदंडा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मात्र, मृत्यूच्या परिस्थितीबाबत नातेवाईकांनी संशय व्यक्त केल्याने पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरू आहे. मृत्यूचे नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे.

# ऐतिहासिक पुस्तकाचे अलिबागमध्ये प्रकाशन




| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

निमिष थळे लिखित 'अष्टागराचा शिरोमणी किल्ले सागरगड' या ऐतिहासिक पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पार पडला. आषाढी एकादशीच्या मुहूर्तावर या पुस्तकाचे प्रकाशन सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नववे वंशज सरखेल रघुजीराजे आंग्रे यांच्या हस्ते त्यांच्या मघेरिया या निवासस्थानी करण्यात आले.

यावेळी पुस्तकाचे कौतुक करताना सरखेल रघुजीराजे आंग्रे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील प्रत्येक किल्ल्याचा इतिहास असाच ग्रंथबद्ध होणे आवश्यक आहे. निमिष थळे यांनी सागरगड किल्ल्याचा इतिहास अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला आहे.स्वराज्याचादेदीप्यमानइतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी असे उपक्रम मैलाचा दगड ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या प्रकाशन सोहळ्याला सामाजिक कार्यकर्ते व व्यावसायिक आकाश राणे, दुर्गरक्षक संस्थेचे अध्यक्ष सिद्धार्थ नाईक यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सागरगड या ऐतिहासिक किल्ल्याचा सर्वसमावेशक इतिहास उलगडणारे हे पुस्तक इतिहासप्रेमी आणि दुर्गप्रेमींसाठी एक उत्तम भेट ठरणार आहे. हे पुस्तक ठाणगांव, ता. सिन्नर येथील श्री शिवसमर्थ सेवा प्रकाशन यांनी प्रकाशित केले आहे.

## गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील वडघर पंगोली या ठिकाणी असलेल्या स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. जवळजवळ २३ ते २४ वर्षांपूर्वी वडघर पांगलोली या ठिकाणी काका तथा दीपक जोशी यांनी स्वामी समर्थ मठाची स्थापना केली. सुरुवातीला स्वामी समर्थांचा एक फोटो या ठिकाणी ठेवून त्याची नित्य नियमित पूजा व अर्चना करण्यात होती. त्यानंतर काही दिवसांनी स्वामी समर्थ यांची भव्य अशी मूर्ती त्या ठिकाणी स्थापित करण्यात आली. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते स्वामी समर्थांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व तत्कालीन लोकसभा अध्यक्ष मनोहर जोशी हेसुद्धा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# श्रीवर्धनमधील दोन कोटींचे सीसीटीव्ही 'बंद'



- **जनतेच्या पैशांचा अपव्यय?**
- **१०९ ठिकाणी बसवलेले कॅमेरे तीन महिन्यांपासून बंदावस्थेत**
- **नगरपरिषद प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

शहराच्या सुरक्षेसाठी तब्बल दोन कोटी रुपये खर्च करून १०९ ठिकाणी बसविण्यात आलेली सीसीटीव्ही यंत्रणा गेल्या तीन महिन्यांपासून बंद असल्याचा आरोप होत आहे. काही कॅमेरे दिशाहीन झाले असून, पोलीस ठाण्यातील त्यांचे मॉनिटरही बंद असल्याने एवढा मोठा खर्च करून उभारलेली यंत्रणा कुचकामी ठरल्याचे चित्र आहे. त्यामुळे जनतेच्या पैशांचा हा अपव्यय नेमका कोणाच्या निष्काळजीपणामुळे? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन शहरात २०१७ मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. या यंत्रणेचा चोरीसह विविध गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना मोठा फायदा होत होता. शहरातील प्रमुख चौक आणि रस्ते सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आले होते. मात्र, ३ जून २०२० रोजी आलेल्या 'निसर्ग' चक्रीवादळात कॅमेरे, खांब आणि वायरिंगचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शहरातील वाढते पर्यटन आणि सुरक्षिततेची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाकडून जवळपास दोन कोटी रुपये खर्च करून १०९ ठिकाणी नव्याने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. सुरुवातीला वर्ष ते दीड वर्ष काही प्रमाणात यंत्रणा कार्यरत होती.

### पोलीस ठाण्यातील मॉनिटरही बंद

शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण व फुटेज पाहण्यासाठी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात आठ ते नऊ मॉनिटर बसविण्यात आले आहेत. मात्र, सध्या हे मॉनिटरही बंद असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शहरातील सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. श्रीवर्धन हे पर्यटनस्थळ असल्याने पावसाळ्यानंतर पर्यटकांची मोठी गर्दी होणार आहे. अशा परिस्थितीत चोरी, वाहनचोरी अथवा अन्य गुन्हे घडल्यास सीसीटीव्ही फुटेज तपासणे पोलिसांसाठी महत्त्वाचे ठरते. मात्र, कॅमेरेच बंद असल्याने यंत्रणेवर खर्च केलेल्या कोट्यवधी रुपयांचा उपयोग काय, असा सवाल नागरिक करत आहेत.

### काही कॅमेरे रस्त्याऐवजी कुंपणाकडे!

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही कॅमेरे दिशाहीन झाले असून रस्त्यांवर लक्ष ठेवण्याऐवजी कुंपणाकडे रोखले गेले आहेत. त्यामुळे यंत्रणेची देखभाल आणि तांत्रिक दुरुस्ती योग्य पद्धतीने केली जात नसल्याचा आरोप होत आहे. सीसीटीव्ही बसविण्याच्या कामाच्या दर्जाबाबतही नागरिकांमध्ये चर्चा असून, संबंधित ठेकेदाराला राजकीय वरदहस्त असल्याच्या आरोपांचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.शहरातील नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित असलेली ही यंत्रणा तातडीने सुरू करावी, बंद कॅमेरे दुरुस्त करावेत, दिशाहीन कॅमेरे योग्य दिशेने बसवावेत आणि संपूर्ण यंत्रणेची तांत्रिक तपासणी करावी, अशी जोरदार मागणी श्रीवर्धनकरांकडून होत आहे. दोन कोटी रुपये खर्चून उभारलेली यंत्रणा धूळ खात ठेवण्याऐवजी नगरपरिषद प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १ वरून

## खारबंदिस्तीची चाळण, कोट्यवधींची उधळण

त्यांनी पुढे सब-कॉन्ट्रॅक्टर संतोष बुरूडे यांना दिले आहे. त्यानंतर हे काम इतर स्थानिक (गुलाबचंद आणि बबन) ठेकेदारांकडेही सोपविण्यात आल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे कामाच्या गुणवत्तेची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न उपस्थित होत आहे.याप्रकरणी खारलँड विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत मयेकर यांना विचारणा केली असता, 'ठेकेदाराला शो कॉज नोटीस बजावण्यात आली आहे,' असे उत्तर त्यांनी दिले. मात्र, काम निकृष्ट झाल्याचे आरोप असतानाही कोट्यवधी रुपयांची बिले कशी अदा करण्यात आली, कामाची गुणवत्ता तपासणी झाली होती का, याबाबत समाधानकारक उत्तरे मिळाली नाही. या प्रकरणाबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी मंत्री भरत गोगावले यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०४९५५५०७० यावर वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## रिक्षा पलटी; चालक, प्रवासी जखमी

तसेच रिक्षातील प्रवासी यांना किरकोळ दुखापती झाले आहेत. २६ जुलै रोजी सकाळी पावणेदहाच्या सुमारास फिरोज शेख (रा. तळवली जासई) हा रिक्षात प्रवासी भरून पनवेलकडे येत होता. या अपघातात रिक्षाचे नुकसान झाले असून, व्हॅगनार कारचालक रिक्षातील जखमी इसमाना मदत न करता पळून गेला आहे.

## मिठागरमधील कांदळवन प्रकरणाबाबत चालढकल

त्यामुळे मिठागरमधील कांदळवनतोडीचा प्रश्न कायमच गुलदस्त्यात असल्याचे दिसून येत आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कांदळवन महत्त्वाचे ठरत खाडी, समुद्रकिनारपट्टीवर येणारे वादळ, लाटा व जमिनीची होणारी धूप यापासून संरक्षण मिळते. सागरी जीवांचे जन्म, संगोपन स्थान म्हणून कांदळवनाकडे पाहिले जाते. किनारपट्टी परिसराचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण होते. त्यामुळे कांदळवनाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी शासनाने महसूल विभागासह वन विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार केली. त्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. कांदळवन संरक्षणाच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात आले आहे. मात्र, कांदळवन तोडीला शासकीय यंत्रणाच खतपाणी घालत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते महेश ठाकूर यांनी केला आहे. मिठागरमधील गट नं. १०३ पासून ते १०८ पर्यंतच्या भागात तसेच लगत असलेल्या शेतजमिनीकडे वाढलेले कांदळवन काही धनदांडग्यांकडून तोडण्यात आले आहे.

याबाबत तहसील कार्यालयापासून उपविभागीय अधिकारी यांच्यापर्यत तक्रार करण्यात आली आहे. परंतु, फक्त कागदी घोडे नाचवून याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप महेश ठाकूर यांनी केला आहे. धनदांडग्यांना पाठीशी घालण्याचे काम अधिकारी करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महेश ठाकूर यांनी केली आहे.

## महाराष्ट्रात मासेमारी बंदी; परराज्यांच्या बोटींना मोकळे रान?

कृती समितीचे सरचिटणीस किरण कोळी यांनी राज्याच्या जलहद्दीवर देखरेख ठेवण्यासाठी पुरेशी यंत्रणा नसल्याचा आरोप केला. पावसाळी बंदीच्या काळात शासनाच्या पाचही गस्ती नौका किनाऱ्यावर असल्याने परराज्यातील बोटींवर कारवाई कशी होणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट फिशरमेन्स वेल्फेअर असोसिएशनचे संचालक रमेश नाखवा यांनीही मत्स्यसंपदेच्या संवर्धनासाठी पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरील सर्व राज्यांना समान बंदी कालावधी लागू करण्याची मागणी केली.

## सर्वोच्च न्यायालयाचा 'बुलडोझर'!

महामार्गांच्या हद्दीतील अनधिकृत दुकाने, हॉटेल्स, गाळे, शेड, जाहिरात फलक आणि व्यावसायिक बांधकामांची पाहणी करून आवश्यकतेनुसार मोजणी व सीमांकन करण्यात येणार आहे. त्यानंतर ओळख पटलेली अतिक्रमणे ६० दिवसांत हटविण्यात येणार आहेत. या मोहिमेचा आढावा विभागीय आयुक्त घेणार असून, प्रत्येक जिल्ह्याला कारवाईचा अहवाल नियमितपणे सादर करावा लागणार आहे. महामार्ग सुरक्षित, अडथळामुक्त आणि अपघातमुक्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने आता अतिक्रमणांवर खऱ्या अर्थाने 'बुलडोझर' चालणार का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## करोडोंची सायबर फसवणूक उघड

नावावर बोगस बॅंक खाते उघडणे, त्यातून आर्थिक अफरातफर करून फसवणूक करणे हा प्रकार रायगड पोलिसांच्या निदर्शनास आला. पोलिसांनी गेल्या अनेक दिवसांपासून या प्रकरणाचा शोध घेतला. म्यूल बॅंक खातेधारकांनी आर्थिक लाभासाठी कमिशन घेऊन बॅंक खाती दुसऱ्याला वापरण्यास दिल्याचे निष्पन्न झाले. संघटित सायबर गुन्हेगारी टोळी चालविणाऱ्यांविरोधात कारवाई करून २३ गुन्हे दाखल करण्यात आले. जिल्ह्यातील सायबर पोलीस ठाण्यात ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच श्रीवर्धन, अलिबाग, रोहा, नागोठणे, कर्जत, रसायनी, माणगाव, कर्जत, खोपोली, पोयनाड, पेण, कर्जत व कोलाड या १३ पोलीस ठाण्यांमध्ये नोंद करण्यात आली आहे. सायबर गुन्हेगारीच्या दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या घटनांना आळा बसविण्यासाठी म्युल बॅंक खातेधारकांविरोधात पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी केली. सायबर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आली आहे.

## सलाम ऑस्कर!

अडथळे निर्माण झाले किंवा महत्त्वाचे धागेदोरे हाती लागत नसताना त्याच्या असामान्य क्षमतेमुळे पोलिसांना आरोपींपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. त्यामुळे ऑस्कर हा रायगड पोलीस दलासाठी केवळ श्वान पथकाचा सदस्य नव्हता, तर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी झटणारा चार पायांचा निःशब्द योद्धा होता. निष्ठा, शिस्त आणि कर्तव्याप्रती असलेले समर्पण यामुळे ऑस्करने अधिकारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते. प्रत्येक मोहिमेत उत्साहाने सहभागी होणारा ऑस्कर अनेक कर्मचाऱ्यांसाठी कुटुंबातील सदस्यासारखाच झाला होता. त्यामुळे त्याच्या निधनाची बातमी समजताच रायगड पोलीस दलात हळहळ व्यक्त करण्यात आली. ऑस्करने आपल्या सात वर्षांच्या सेवेत दिलेले योगदान आणि दाखवलेली कर्तव्यनिष्ठा पोलीस दलाच्या स्मरणात कायम राहणार आहे. बोलता येत नव्हते, पण आपल्या कृतीतून कर्तव्याची भाषा शिकवून जाणाऱ्या या निःशब्द प्रहरीला रायगड पोलीस दलाच्यावतीने पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

ऑस्करची पावले थांबली; पण त्याची निष्ठा, पराक्रम आणि सेवाभाव रायगड पोलीस दलाच्या इतिहासात कायम अजरामर राहील.

## शेकापच्या वर्धापन दिनासाठी खालापूर सज्ज

आजच्या सत्ताकेंद्रित आणि पक्षांतराच्या राजकारणात विचारांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत असल्याचा संदेश या वर्धापन दिनातून दिला जाणार आहे. शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेणाऱ्या शेकापच्या संघर्षमय परंपरेचा पुनरुच्चार या व्यासपीठावरून होणार असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे.

खालापूरमध्ये सुरू असलेली भव्य तयारी, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आयोजनातील सुसूत्रता पाहता २ ऑगस्ट रोजी लालबावट्याचे हे वादळ केवळ एका पक्षाचा कार्यक्रम न राहता विचार, संघर्ष आणि जनतेशी असलेल्या नात्याचा भव्य सोहळा ठरणार, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## कागदी गणेशमूर्ती आफ्रिकेला रवाना



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या कागदी गणेशमूर्तींना यंदा परदेशातूनही मोठी मागणी मिळाली आहे. मध्य आफ्रिकेतील रिपब्लिक ऑफ काँगो येथे गणेशोत्सवासाठी नेरूळ येथील मूर्तिकार एम.पी. पवार यांनी साकारलेल्या कागदी श्रीगणेश मूर्ती रवाना झाल्या आहेत. गेली अनेक वर्षे एम.पी. पवार पर्यावरणपूरक कागदी गणेशमूर्ती तयार करत असून, त्यांच्या मूर्ती भारतासह विविध परदेशी देशांमध्येही पोहोचत आहेत. यंदा आफ्रिकेतील गणेशभक्तांसाठी विशेषतः ६ फूट उंचीची सुमारे २० किलो वजनाची (लाकडी फळीसह) तसेच ५ फूट उंचीची सुमारे १५ ते १८ किलो वजनाची कागदी गणेशमूर्ती तयार करण्यात आली आहे. हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि निसर्गावर होणारे परिणाम लक्षात घेता पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर जगभर भर दिला जात आहे. निसर्गावर होणारा वाढता ताण आता विविध नैसर्गिक आपत्तींच्या माध्यमातून जाणवत असल्याने पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. परदेशातील गणेशभक्त पर्यावरण जपण्यासाठी कागदी गणेशमूर्तींचा स्वीकारकरतअसताना,भारतातील नागरिकांनीही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन मूर्तिकार एम.पी. पवार यांनी केले आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या कलाकौशल्यासह पर्यावरण संवर्धनाचा संदेश सातासमुद्रापार पोहोचत असल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# चोरीचे एअर रायफल, पिस्टलसह आरोपीला बेड्या



| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

कॅपिटल लँड या वेअर हाऊस कंपनीमधून एअर रायफल आणि एअर पिस्टल चोरणाऱ्या आरोपी प्रदोष प्रल्हाद पाटील (रा. साई) याला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

२२ जुलै रोजी पनवेल तालुक्यातील साई येथील कॅपिटल लँड या वेअर हाऊस कंपनीमध्ये वॉल्टर कंपनीचा एअर रायफल आणि एअर पिस्टल सुरक्षेसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यातील २३ लाख रुपयांच्या आठ एअर रायफल आणि एअर पिस्टलची चोरी करण्यात आली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके, पोलीस हवालदार देवरे, कुदळे, तांडेल, बाबर, पोलीस शिपाई भगत यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला आणि आरोपी प्रदोष प्रल्हाद पाटील (रा. साई) याच्याकडे तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरी केलेले एअर रायफल आणि एअर पिस्टल या त्याच्या ओळखीच्या लोकांना विक्री केले असल्याचे सांगितले. पोलिसांनी चोरीला गेलेला मुद्देमाल हरियाणा, तामिळनाडू, रत्नागिरी, पुणे, यवतमाळ येथे तपासासाठी पथके रवाना करून शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत केला.

# ग्रामपंचायत विकास आराखड्यावर कार्यशाळा


| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

ग्रामपंचायत विकास आराखड्यावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान २०२६-२७ अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा प्रभावीपणे तयार करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने मंगळवारी (दि.२८) कर्नाळा-पनवेल येथील हॉटेल विसावा येथे आयोजित करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, वित्त व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आले. कार्यशाळेत जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे खाते प्रमुखांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. लोकसहभागातून विकास नियोजन, शाश्वत विकास ध्येये, पंचायत प्रगती निर्देशांक, १६वा वित्त आयोग, विभागीय योजनांचे अभिसरण आणि ई-ग्रामस्वराज या माध्यमातून परिणाम कारक, पारदर्शक आणि उत्तरदायी विकास आराखडे तयार करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वित्तीय नियोजन, विविध शासकीय योजनांचे प्रभावी अभिसरण, १६व्या वित्त आयोगाच्या निधीचा नियोजनबद्ध वापर आणि पुढील पाच वर्षांच्या विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या विकास आराखड्याविषयी सविस्तर मार्गदर्शन मान्यवरांनी केले. विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया आणि ई-ग्रामस्वराज प्रणालीचा प्रभावी वापर यावर सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

## सतर्कतेमुळे संभाव्य अनर्थ टळला

**खांदा कॉलनी :** पनवेल रेल्वे स्थानकावर बुधवारी (दि.२९) सकाळी पुणे-एर्नाकुलम एक्स्प्रेसच्या वातानुकूलित डब्यातील बोगीचा कंट्रोल आर्म अपर पार्ट तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. रेल्वे प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित डबा स्पेअर केला. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा स्थानक परिसरात होती. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-एर्नाकुलम एक्स्प्रेस सकाळी साडेसहा वाजता पनवेल रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर आल्यानंतर सव्वासात वाजण्याच्या सुमारास स्टेशन मास्टर आणि मुंबई कंट्रोलकडून संबंधित डब्यात तांत्रिक बिघाड असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर स्टेशन मास्टर झाकीर पालेकर व त्यांच्या तांत्रिक पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत सखोल तपासणी केली.



# साधेपणातून मोठेपण जपणारे 'आबा'!

**महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते आले, काही सत्तेच्या शिखरावर पोहोचले आणि काळाच्या ओघात विस्मृतीतही गेले. मात्र, गणपतराव तथा आबासाहेब देशमुख हे नाव या सगळ्याला अपवाद ठरते. सत्ता, संपत्ती आणि राजकीय पदापेक्षा जनतेशी असलेली नाळ अधिक महत्त्वाची मानणाऱ्या या लोकनेत्याने तब्बल ११ वेळा सांगोला विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. आयुष्याच्या अखेरपर्यंत शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा, विचार आणि निष्ठा त्यांनी सोडली नाही. आजच्या बदलत्या राजकारणात अशी एकनिष्ठता दुर्मिळ झाल्याने आबासाहेबांची आठवण अधिक प्रकर्षाने होते.**

१० ऑगस्ट १९२६ रोजी मोहोळ तालुक्यातील पेण्णुर येथे जन्मलेल्या गणपतराव देशमुखांनी पंढरपूर येथे शालेय शिक्षण घेतल्यानंतर पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून कला शाखेची पदवी घेतली. त्यानंतर कायद्याचे शिक्षण पूर्ण करून त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला. मात्र, केवळ न्यायालयात लोकांना न्याय मिळवून देण्यापेक्षा समाजातील कष्टकरी, शेतकरी आणि वंचितांच्या प्रश्नांसाठी व्यापक पातळीवर लढण्याची त्यांची धडपड होती.

पुण्यातील वास्तव्यात शंकरराव मोरे, केशवराव जेधे यांसारख्या नेत्यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. मार्क्सवादी विचारसरणी, शेतकरी-कामगारांचे प्रश्न आणि सामाजिक विषमता यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यातूनच राजकारणात प्रवेश करायचा असेल, तर तो कष्टकरी जनतेसाठीच, हा विचार त्यांनी मनाशी पक्का केला. शेतकरी कामगार पक्षाशी जोडले गेले आणि पुढे अखेरपर्यंत त्याच पक्षाशी निष्ठावंत राहिले.



संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही गणपतरावांनी सक्रिय सहभाग घेतला. सांगोला तालुक्यात भूमिगत राहून पत्रके वाटण्यापासून ते जनजागृतीपर्यंत त्यांनी काम केले. १९६२ मध्ये सांगोला विधानसभा मतदारसंघातून त्यांनी पहिली निवडणूक लढवली. दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी प्रचार केला. सुरुवातीला विजयाची शक्यता कमी मानली जात असतानाही सांगोल्याच्या जनतेने त्यांच्यावर विश्वास दाखवला आणि आबांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात झाली.

त्यानंतरच्या काळात सांगोला आणि गणपतराव देशमुख हे जणू एकमेकांचे पर्यायवाची बनले. १९७२ आणि १९९५चा अपवाद वगळता त्यांनी प्रत्येक निवडणुकीत विजय मिळवला. एकाच मतदारसंघातून ११ वेळा निवडून येण्याचा विक्रम त्यांच्या नावावर जमा झाला. मात्र, एवढ्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीनंतरही त्यांच्या राहणीमानात आमदारकीचा गर्व कधीच दिसला नाही.

सांगोल्याच्या विकासाची खरी कहाणी मात्र पाण्याच्या लढ्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कायम दुष्काळाच्या छायेत असलेल्या सांगोल्यात महिलांना पाण्यासाठी मैलोन्‌मैल पायपीट करावी लागत होती. या परिस्थितीने आबासाहेबांना अस्वस्थ केले. शिरभावी पाणीपुरवठा योजना, टेंभू-म्हैसाळसह कृष्णा खोऱ्यातील प्रकल्प आणि दुष्काळी भागाला पाणी मिळावे, यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला.

क्रांतिसिंह नाना पाटील आणि नागनाथअण्णा नायकवडी यांच्या सहकार्याने दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी पाणी संघर्षाची व्यापक चळवळ उभी केली. मोर्चे, रास्ता रोको, धरणे, जेल भरो अशा लोकशाही मार्गाने सरकारवर दबाव निर्माण करण्यात आला. पाणी हा केवळ सांगोल्याचा प्रश्न नसून तेरा दुष्काळी तालुक्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे, या भूमिकेतून त्यांनी हा लढा पुढे नेला.

पाणी आले तेव्हा त्याचे श्रेय घेण्यासाठी धावपळ करणाऱ्यांमध्ये आबासाहेब कधीच नव्हते. उलट, 'पाणी आले हे महत्त्वाचे; श्रेय कोणाला मिळते यापेक्षा जनतेची तहान भागली पाहिजे,' अशी त्यांची भूमिका होती. स्वतःच्या राजकीय कर्तृत्वाचा गाजावाजा न करता जनतेच्या संघर्षाला श्रेय देणारा नेता, हीच त्यांची खरी ओळख होती.

आबासाहेबांनी केवळ पाण्यासाठी लढा दिला नाही, तर शिक्षण, सहकार, उद्योग, शेती आणि रोजगाराच्या क्षेत्रातही सांगोल्याला पुढे नेण्यासाठी संस्थात्मक काम उभे केले. शिक्षण संस्थांची उभारणी, सहकारी साखर कारखाना, सूतगिरणी, औद्योगिक वसाहत तसेच फळबागांना प्रोत्साहन देण्याच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचा प्रयत्न केला.

आज राजकारणात पक्षांतर, सत्तेची समीकरणे आणि पदासाठीची धावपळ नित्याची झाली आहे. अशा वातावरणात एका पक्षाच्या विचारांशी तब्बल सात दशके प्रामाणिक राहणारा नेता म्हणून गणपतराव देशमुखांचे आयुष्य नव्या पिढीसाठी अभ्यासाचा विषय ठरते. त्यांनी शेकापचा झेंडा केवळ हातात घेतला नाही, तर त्या झेंड्यामागील शेतकरी-कामगारांच्या विचारांना आपल्या आचरणातून जगले.

आबासाहेबांच्या राजकारणात विरोधक होते, संघर्ष होते; पण व्यक्तिगत कटुता नव्हती. मतभेद असले तरी माणसांशी संबंध जपण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यामुळेच विरोधी विचारांचे लोकही त्यांचा आदर करत. राजकारणात पराभव झाला तरी माणूस म्हणून जिंकता आले पाहिजे, हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा संदेश होता.सांगोल्याच्या विकासासाठी त्यांनी उभारलेल्या संस्था आणि प्रकल्प हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. पाण्याचा प्रश्न असो, शिक्षणाचा असो, सहकाराचा असो किंवा शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्याचाआबासाहेबांनी समस्येवर तात्पुरता उपाय शोधण्यापेक्षा पुढच्या पिढ्यांचे आयुष्य बदलणारी व्यवस्था उभी करण्यावर भर दिला.विधानसभेतील प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी मंत्रीपदही भूषविले आणि विरोधी पक्षनेते म्हणूनही काम केले. मात्र, सत्तेच्या खुर्चीपेक्षा विचारांची खुर्ची त्यांच्यासाठी मोठी होती. मुंबईला येताना एसटी बसने प्रवास करणारा ११ वेळा आमदार, मतदारसंघात फिरताना सामान्य माणसासारखा जनतेत मिसळणारा नेता आणि कार्यकर्त्यांशी आपुलकीने वागणारा 'आबा' म्हणून त्यांची ओळख शेवटपर्यंत कायम राहिली.

३० जुलै २०२१ रोजी गणपतराव देशमुख यांचे निधन झाले. शरीराने ते आज आपल्यात नसले तरी साधेपणा, निष्ठा, निष्कलंक चारित्र्य, कष्टकरी जनतेसाठीचा संघर्ष आणि सत्तेपेक्षा विचारांना दिलेले महत्त्व ही त्यांची शिकवण आजही महाराष्ट्राच्या राजकारणासाठी दिशादर्शक आहे.

आज त्यांच्या स्मृतिदिनी आबासाहेबांना अभिवादन करताना एकच भावना मनात येते राजकारण बदलले, चेहरे बदलले, पक्ष बदलले; पण जनतेसाठी जगणारा आणि शेवटपर्यंत आपल्या विचारांशी प्रामाणिक राहणारे 'आबा' पुन्हा होणे नाही. जनतेच्या मनात कायमचे घर करणाऱ्या या ऋषितुल्य गणपतराव देशमुख यांना विनम्र अभिवादन..!

## निवडक



### पाली एसटी स्थानकासमोरील खड्डे रिक्षाचालकांनी भरले

**सुधागड-पाली :** पाली येथील एस.टी. बस स्थानकासमोरील रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक, प्रवासी तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. विशेषतः एस.टी. बस स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरील या खड्ड्यांमुळे बस, रिक्षा आणि इतर वाहनांना अपघाताचा धोका वाढला होता. बस खड्ड्यात अडकणे किंवा तोल जाऊन दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत होते. ही बाब लक्षात घेऊन पालीतील रिक्षाचालकांनी कोणाचीही वाट न पाहता स्वतः पुढाकार घेत श्रमदानातून हे खड्डे भरून वाहतूक सुरळीत करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. त्यांच्या या कार्यामुळे अनेक वाहनचालक आणि प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, सर्व स्तरांतून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले जात आहे. एस.टी. स्थानक परिसरातील रस्त्यांची सुरक्षितता आणि देखभाल ही संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी मानली जाते. अशा ठिकाणी उद्भवणाऱ्या समस्यांकडे नगरपंचायत तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी समन्वयाने लक्ष देणे अपेक्षित आहे. मात्र, खड्ड्यांची दुरुस्ती वेळेत न झाल्याने अखेर रिक्षाचालकांनाच पुढाकार घ्यावा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### जेएनपीए टाऊनशिपमध्ये सुरक्षा पास बंधनकारक

**उरण :** जेएनपीए टाऊनशिपमधील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी प्रशासनाने सुरक्षा नियम अधिक कडक केले आहेत. यापुढे सुरक्षा पास स्टिकर नसलेल्या कोणत्याही वाहनाला टाऊनशिपमध्ये प्रवेश दिला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रहिवाशांवर निवासी वाटप रद्द करण्यासह अन्य दंडात्मक कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. जेएनपीए प्रशासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, टाऊनशिपमध्ये ज्यांच्या नावावर घर किंवा दुकान आहे तसेच जेएनपीए टाऊनशिपमधील विविध कार्यालयांमध्ये कार्यरत कर्मचारी यांनाच वाहनांसाठी सुरक्षा पास देण्यात येणार आहे. जेएनपीएच्या आवश्यकतेनुसार काही अन्य पात्र व्यक्तींनाही सुरक्षा पास देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्राथमिक सूचना दि.९ एप्रिल रोजीच देण्यात आल्या होत्या. प्रशासनाने टाऊनशिपमधील घर किंवा दुकानधारकांना थकीत भाडे तातडीने भरून इस्टेट विभागाच्या बी-१०१/३, सेक्टर-२ येथील कार्यालयातून सुरक्षा पास घेण्याचे आवाहन केले आहे. जेएनपीएमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांनी टाऊनशिपच्या मुख्य प्रवेशद्वारावर संपर्क साधून सुरक्षा पास प्राप्त करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यापुढे सुरक्षा पास स्टिकर नसलेल्या वाहनांना टाऊनशिपमध्ये प्रवेश मिळणार नाही. कोणत्याही कारणास्तव सुरक्षा पास न मिळालेल्या अधिकृत रहिवाशांना किंवा कर्मचाऱ्यांना टाऊनशिपमध्ये प्रवेश करताना आणि बाहेर पडताना प्रवेशद्वारावरील नोंदवहीत आवश्यक माहिती नोंदवावी लागणार आहे.


# माथेरानमधील आपत्ती व्यवस्थापन नावापुरतेच

**|| नागरी समस्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष || मुख्याधिकाऱ्यांविरोधात अविश्वासाची मागणी**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी पावसाळ्यातील चार महिने सर्वाधिक झाडे कोसळण्याचे प्रमाण असते. या काळात आपत्ती व्यवस्थापनाची सर्वाधिक कसोटीचा काळ असतो. मात्र, त्यात यंदा माथेरान नगरपरिषद कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. शहरात असलेल्या पेव्हर ब्लॉक रस्त्यांवर साधी ब्लिचिंग पावडर देखील टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे त्याचा भार स्थानिक पातळीवर नगरसेवकांना उचलावा लागत आहे. नगर परिषद प्रशासनाकडून नागरी समस्या सोडवण्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या या उदासीन कारभारामुळे मुख्याधिकाऱ्यांविरोधात अविश्वास ठराव आणण्याची मागणी शहरातील नागरिक करीत आहेत.

माथेरान शहरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे ठिकठिकाणी पाणी साचून राहते. त्यामुळे जीवजंतूंमुळे आरोग्याचा प्रश्न उद्भवू शकतो. शहरातील पेव्हर ब्लॉक रस्त्यांवर शेवाळ साचल्यामुळे पाय घसरून अपघात होण्याची शक्यता असते. तसेच, या ठिकाणी झाडे उन्मळून पडण्याचे प्रमाण देखील अधिक आहे. असे असतानाही याबाबत माथेरान नगरपरिषद प्रशासनाकडून मान्सूनपूर्व काळात कोणतीही



खबरदारी घेण्यात आलेली दिसत नाही. माथेरानमध्ये मान्सूनपूर्व काळात जंतुनाशक औषधांची फवारणी, ब्लीचिंग पावडर टाकणे, धूप प्रतिबंधक बंधारे उभारणे इत्यादी आवश्यक उपाययोजना होणे अपेक्षित असताना, यंदा अशा कामांच्या पूर्वतयारीचा अभाव दिसून येत आहे. त्यामुळे माथेरानमधील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, स्थानिक पातळीवर नगरसेवक आपल्या वैयक्तिक खर्चातून हा भार उचलत आहेत.

यंदा प्रशासनाकडून साधी ब्लिचिंग पावडर टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे माथेरानमधील संत रोहिदास नगर आणि पंचशील नगर येथील पेव्हर ब्लॉक रस्त्यांवर शेवाळ साचल्यामुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन, नगरसेवक सचिन दाभेकर यांनी स्वतःच्या खर्चातून त्याठिकाणी ब्लीचिंग पावडर टाकण्याचे काम केले. मुख्याधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधीनींकडून वारंवार सूचना केल्यानंतर देखील मान्सूनपूर्व आवश्यक नागरी सुविधा पुरविल्या जात नसतील, तर त्या सुविधा नगरसेवकांनीच स्वतःच्या खर्चातून द्यायच्या का? मग नागरिकांकडून कर वसूल करण्याचा उद्देश काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

त्यामुळे मान्सूनपूर्व कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांविरोधात सत्ताधारी नगरसेवकांनी अविश्वासाचा ठराव आणावा, त्याला विरोधी पक्षाच्या नगरसेवकांचा बिनशर्त पाठिंबा राहील, अशी भूमिका देखील सचिन दाभेकर यांनी स्पष्ट केली आहे. तसेच, या संदर्भात नगरपरिषदेच्या सभेत तसेच नगरपरिषदेच्या अधिकृत समाज माध्यमांवर वारंवार सूचना करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे माथेरान नगरपरिषद प्रशासन धृतराष्ट्राची भूमिका घेत असल्याचा आरोप करत दाभेकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर विद्यमान सत्ताधारी नगरसेवक नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे आता संपूर्ण माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

# हस्तकलेद्वारे महिलांना स्वयंरोजगाराची संधी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव-लोणारे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (बाटू) संचालित बांबू कौशल्य आणि संशोधन केंद्राच्यावतीने मुरुड तालुक्यातील बारशिव येथील राधाकृष्ण मंदिरात बांबू प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील महिला आणि युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देश या कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आले होते.




या कार्यशाळेला विशेषतः महिला व तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, एकूण १५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बारशिवचे सरपंच हर्षद महाडिक, उपसरपंच प्रसाद चौलकर व प्रा. तेजस महागावकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी ग्रामीण भागातील महिलांना आणि युवकांना रोजगाराभिमुख कौशल्ये आत्मसात करण्यासाठी अशा प्रशिक्षण उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. बांबू आधारित उद्योग हा पर्यावरणपूरक असून, कमी भांडवलात सुरू करता येणारा व्यवसाय असल्याने स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीसाठी तो प्रभावी ठरू शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले. दिवसभर चाललेल्या या प्रशिक्षणामध्ये सहभागी महिलांना बांबूपासून आकर्षक राखी आणि कानातले तयार करण्याचे प्रात्यक्षिकासह प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींनी स्वतः विविध आकर्षक हस्तकला वस्तू तयार करत बांबू कलाकुसरीतील बारकावे शिकून घेतले. या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे तसेच भविष्यात स्वतः चा छोटा उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळाल्याच्या भावना सहभागी महिलांनी व्यक्त केल्या.




# पनवेलमधील स्वयंचलित टॉयलेट उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या पश्चिम दिशेला नवी मुंबई महानगर परिवहन बस डेपो बसथांब्यालगत अत्याधुनिक ऑटोमॅटेड सार्वजनिक शौचालय उभारण्यात आले आहे. परंतु, ते गेल्या चार महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असल्याने बंद अवस्थेत आहे. लाखो रुपये खर्च करून उभारलेली ही सुविधा अद्याप नागरिकांच्या सेवेत न आल्याने पनवेल महापालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पनवेल रेल्वे स्थानक परिसरातून दररोज हजारो प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच लहान मुलांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. याच ठिकाणी नवी मुंबई महानगर परिवहनचे अधिकारी व कर्मचारीही कार्यरत आहेत. मात्र, सार्वजनिक शौचालय बंद असल्याने नागरिकांना नैसर्गिक विधीसाठी पनवेल रेल्वे स्थानकातील दूरवर असलेल्या शौचालयाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. सर्व सुविधा तयार असूनही केवळ उद्घाटनाच्या प्रतीक्षेत हे शौचालय बंद ठेवण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

# नागोठण्यात भरदिवसा चोरी

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील दुकानात सोमवारी (दि.२७) भर दिवसा मोबाईल चोरी होण्याची घटना घडली. तस्मित इंटरप्रायजेस या दुकानातून ६२ हजारांचा मोबाईल चोरट्याने लंपास केला आहे. या चोरीमुळे शहरात एकच खळबळ निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छ. शिवाजी महाराज चौकातील मोबाईल ॲक्सेसरीज, रिचार्ज व झेरॉक्सचे दुकान असलेल्या तस्मित इंटरप्रायजेस या दुकानाचे मालक नसीम इलामी हे आपल्या दुकानाचे शटर अर्धे खाली



• (छायाचित्र : महेश पवार)

**■ ६२ हजारांचा मोबाईल लंपास**

करून जेवायला गेले होते. ही संधी साधून चोरट्याने दुकानात प्रवेश केला आणि चार्जिंगला लावलेला मोबाईल हातचलाखीने चोरून नेला आहे. हा चोरटा सी.सी. टीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने या सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे नागोठणे पोलीस चोरट्याचा कसून शोध घेत आहेत. चोरट्याने दुकानावर पाळत ठेऊन हा प्रकार केला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. अशा प्रकारे भरदिवसा होणाऱ्या चोऱ्यांमुळे नागोठण्यातील व्यापाऱ्यांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे.

रिलायन्स कंपनीच्या विस्तारित प्रकल्पात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय कामगार नागोठणे शहर व परिसरात राहण्यास आले असून, दिवसेंदिवस त्यात भर पडत आहे. तर, काही कामगार अशाप्रकारे चोरीच्या घटना घडवून आणत असल्याचे बोलले जात आहे.

## उरणच्या गगनचुंबी इमारतींवर मृत्युछत्र

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील वाढत्या गगनचुंबी इमारतींच्या छतांवर मोठ्या प्रमाणात पत्र्यांचे शेड उभारण्यात आले असून, पावसाळ्यातील वादळी वाऱ्यांमुळे हे पत्रे उडून मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नवी मुंबईप्रमाणेच उरणमध्येही अनेक उंच इमारती, व्यावसायिक संकुले तसेच बांधकामांवर सुरक्षा नियमांना हरताळ फासून पत्र्यांची उभारणी करण्यात आल्याचे चित्र आहे. मात्र, याकडे उरण नगरपरिषद प्रशासन, नगररचना विभाग आणि अग्निशमन यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दरवर्षी पावसाळ्यात जोरदार वाऱ्यामुळे जाहिरात फलक, लोखंडी पत्रे, बांधकामांवरील तात्पुरती संरचना आणि टिनशेड उडून अपघात घडत असतात. तरीदेखील उरणमध्ये अशा धोकादायक संरचनांची कोणतीही व्यापक तपासणी करण्यात आलेली नाही. अनेक इमारतींच्या छतांवर बसविण्यात आलेले मोठमोठे पत्रे वाऱ्याच्या झोताने उडून रस्त्यावर, शेजारच्या इमारतींवर किंवा वाहनांवर कोसळल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. संबंधित विभागांकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड**
(भारत सरकार चा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई - 400 074
CIN - L24110MH1978GOI020185
आर सी एफ Let us grow together A NAVRATNA COMPANY

जाहिरात क्र.16022026

**ट्रॉम्बे/थळ/विभागीय कार्यालयांसाठी संपूर्ण भारतात भरती**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी ''नवरत्न'' कंपनी आहे, ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे रु. 18690.90 कोटी आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्याचे उत्पादन युनिट महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे:

| क्र. सं. | पोस्ट कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | MTCHEM/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (रसायन) | 32 |
| 2 | MTBOI/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (बॉयलर) | 06 (4 बॅक लॉग सह) |
| 3 | MTMECH/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (यांत्रिकी) | 4 |
| 4 | MTELE/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (विद्युत) | 10 |
| 5 | MTINST/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (उपकरण) | 9 |
| 6 | MTMTL/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सामग्री) | 1 |
| 7 | MTCIV/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सिविल) | 1 |
| 8 | MTFIRE/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (अग्निशमन) | 1 |
| 9 | MTCCLAB/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सीसी लॅब) | 1 |
| 10 | MTIE/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (औद्योगिक अभियांत्रिकी) | 2 |
| 11 | MTIT/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सूचना प्रौद्योगिकी) | 5 |
| 12 | MTRAJBH/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (राजभाषा) | 2 |
| 13 | MTFIN/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (वित्त) | 10 |
| 14 | MTMKTG/022026 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (विपणन) | 10 |

इच्छुक उमेदवार अधिक माहितीसाठी कंपनीची वेबसाइट www.rcfltd.com वरील 'रिक्रूटमेंट' सेक्शन पहावे.

कार्यकारी संचालक (मा.सं.)

समृद्धीची एकत्र वाटचाल

**पीएनपी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण | वेबिनार अन् घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन**

# सायन्स फोरमचे उद्घाटन उत्साहात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या अलिबाग-वेश्वी येथील महाविद्यालयात मंगळवारी (दि.२८) सायन्स फोरमचे उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी चित्रलेखा फॉर एन्व्हायर्नमेंट या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. तसेच, प्रा. केतकी पाटील यांच्या वेबिनारचे आणि घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमासाठी




प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. केतकी पाटील यांनी ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा म्हात्रे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पूजा म्हात्रे यांनी केले. त्यांनी जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनाचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त भाषणे सादर केली. प्रा.डॉ. ओमकार पोटे यांनी अध्यक्षीय वक्तव्य करत विद्यार्थ्यांच्या प्रभावी वक्तृत्वाचे कौतुक केले. प्रा. केतकी पाटील यांनी ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत विज्ञानाचे महत्त्व, पर्यावरणसंवर्धनाचीगरज,संशोधनाची दिशा आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, घोषवाक्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. स्पर्धेमध्ये स्नेहा पाटील हिने प्रथम, साहिल मोटे याने द्वितीय, तर रिद्धी पाटील हिने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, दिशाली नाईक आणि नयन गायकवाड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रा.डॉ. ओमकार पोटे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कैलाससिंग राजपूत यांनी केले, तर अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन सायन्स फोरमचे प्रमुख प्रा. करण वाडकर आणि सायन्स फोरमच्या सदस्यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

## पोलिसी छळवणूक सुरू

दिल्ली आंदोलनात पोलिसांनी केलेल्या लाठीमाराची दृश्ये या देशातील १४० कोटी लोकांपर्यंत पोचलेली आहे. त्यांनी या घटनेबाबत आपल्यापुरता काय तो न्याय केलेला आहे. आंदोलनामध्ये काही जण चुकीचे वागलेही असतील. पण एकूण आंदोलन न्याय्य मागणीसाठीचे व अत्यंत शांततापूर्ण होते यात नागरिकांच्या मनात तिळमात्र शंका नाही. या देशातील सरकार, त्यांचे गुलाम असल्यासारखे वागणारे पोलिस यांचे मात्र वेगळे मत आहे. आणि न्यायालये सध्या तरी अशी काही सावध भूमिका घेत आहेत की जी सरकारला मदत करणारी आहे की काय असे वाटावे. वीस जुलैला संसदेकडे निघालेल्या मोर्चावर जबर लाठीमार झाला. त्यामुळे देशभर संताप उसळला. एक तातडीची बाब म्हणून हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित करण्याचा प्रयत्न झाला. पण तेव्हा आमचा वेळ वाया घालवू नका असे सरन्यायाधीशांनी तो मुद्दा उपस्थित करणाऱ्यांना बजावले. त्याबाबत जोरदार टीका झाली. तिच्यामुळे असेल की आणखी काही कारणांमुळे या संदर्भातील याचिकांवर सोमवारपासून सुनावणी सुरु झाली. आता गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या आंदोलकांवर कारवाई करू नका, अठरा वर्षांखालच्या मुलांना सोडून द्या असे आदेश न्यायालयाने मंगळवारी दिले. याबाबत महाराष्ट्रासह अनेक राज्य सरकारांना नोटिसा काढण्यात आल्या. पण मुळात सर्वोच्च न्यायालयाला हे आदेश द्यावे लागावेत हेच विचित्र आहे. लोकशाही व्यवस्थेत आंदोलने होणे हे नित्याचे असते. काँग्रेस सरकारच्या काळात अशी असंख्य आंदोलने झाली. पण त्यात अशा प्रकारे लाठीमार आणि नंतर आंदोलकांवर गुन्हे दाखल करून त्यांची छळवणूक करण्याचे प्रकार झाले नव्हते. यंदा आधी पोलिसांनी अत्याचार तर केलेच, पण आता आंदोलकांना वारंवार नोटिसा पाठवणे, त्यांच्या घरी पोलिस पाठवणे, आईवडिलांना पोलिस स्टेशनला बोलावणे असले उद्योग महाराष्ट्रासह सर्व राज्यांमध्ये चालू आहेत. मुंबईत शेतकरी कामगार पक्षाच्या साम्या कोरडे यांच्यासह अनेकांना पोलिसी दडपशाहीचा फटका बसला. राजकीय कार्यकर्ते अशा कारवाईसाठी तयार असतात. पण आंदोलनामध्ये बहुसंख्य विद्यार्थी हे चळवळीची कसलीही पार्श्वभूमी नसलेले आणि कधीही मोर्चात वगैरे न गेलेले होते. अशांसाठी हा सगळाच नवीन अनुभव आहे.

### प्रोसेस इज पनिशमेंट

या विद्यार्थ्यांनी कोणताही कायदा मोडलेला नाही. हातात शस्त्रे घेतलेली नाहीत. सार्वजनिक मालमत्तेचे कोणतेही नुकसान केलेले नाही. कोणत्याही वैयक्तिक फायद्यासाठी ते मोर्चात गेले नव्हते. परीक्षा व्यवस्थेतील भानगडींच्या विरोधात राग व्यक्त करण्यासाठी आणि सरकारला जाब विचारण्यासाठी ते गेले होते. अंतिमतः धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. म्हणजेच या आंदोलकांच्या म्हणण्यात सत्य होते. अशा स्थितीत सरकारने आता दिल्ली, महाराष्ट्र, बिहार, बंगाल व इतर राज्यांमध्ये या आंदोलकांची जी छळवणूक चालवली आहे ती हुकुमशाहीचा अव्वल नमुना आहे. आता न्यायालयाचा आदेश आला म्हटल्यावर काही गुन्हे मागे घेण्याचे नाटक केले जाईल. पण याबाबतची सरकारी प्रक्रिया नोकरशाहीचा अर्क असते. पोलिसांनी एकदा तक्रार नोंदवली की ती काढून टाकणे सोपे राहत नाही. त्यासाठी कायदा खात्याचा अभिप्राय लागतो. वरिष्ठांच्या भाराभर सह्या लागतात. परवानग्या लागतात. यात भरपूर वेळ लागतो. ते होईपर्यंत हे गुन्हे दिसत राहतात. त्या त्या व्यक्तीला नोकरीसाठी चारित्र्याचे प्रमाणपत्र मिळणे किंवा पासपोर्ट वगैरेंसाठी पोलिसी संमती मिळणे अवघड होऊन बसते. बँका देखी एज्युकेशन लोन देताना तुमच्यावर काही गुन्हा नाही ना असे विचारतात. त्यासाठी पुन्हा सत्तेतल्या कोणाचे तरी पाय पकडावे लागतात. त्यातून ज्यांना विरोध केला त्यांनाच नमस्कार करण्याची वेळ येते. भ्रष्टाचाराचा नवीन प्रकार सुरू होतो. कायद्याची प्रक्रिया या नावाखाली कित्येक वर्षांपासून लाखो लोकांना अशी शिक्षा होत आलेली आहे. मोदी सरकारने याचाच फायदा घेऊन सर्व विरोधकांवर हे एक हत्यार म्हणून वापर केला आहे. मागच्या दिल्ली दंगलींच्या प्रकरणी उमर खालिद वगैरे कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना गेली अनेक वर्ष तुरुंगात डांबून ठेवण्यात आले आहे. त्यांना जामीन मिळू दिला जात नाही. त्यांच्याविरुध्दचे खटलेही चालवले जात नाहीत. म्हणजे ते दोषी ठरलेले नसताना निव्वळ आरोपी म्हणून कित्येक वर्षे तुरुंगवास भोगतात. इंग्रजीत याला प्रोसेस इज पनिशमेंट असे म्हणतात. हीच पनिशमेंट किंवा शिक्षा जंतरमंतर व इतर ठिकाणच्या आंदोलकांना दिली जात आहे.

### बदनामीतून दडपशाही

आंदोलकांनी पोलिसांवर हल्ले केले व म्हणून पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ लाठीमार केला असा कांगावा केला जात आहे. तो खोटा आहे. लाठीमारानंतर काही ठिकाणी मुलांनी दगड भिरकावले असतील. किंवा अश्रुधुराच्या नळकांड्याही परत फेकल्या असतील. पण त्यांना हल्ले म्हणता येत नाही. दुर्दैवाने अशा प्रसंगांमध्ये पोलिसांच्या हातात सत्ता असते. ते म्हणतील तो पुरावा असा प्रकार असतो. नंतर न्यायालयांमध्ये हे गुन्हे बहुतेकदा टिकत नाहीत. पण पोलिस आणि सरकारचा उद्देश साध्य होतो. पोलिस ठाणे आणि न्यायालयाच्या चकरा मारून लोक कंटाळतात. पुन्हा या वाटेला जायचे नाही असे ठरवतात. सुदैवाने यावेळी असे गुन्हे दाखल झालेल्यांच्या मदतीसाठी देशभर वकिलांची फौज उभारली जाणार आहे. डाव्या संघटना, कॉकरोच पार्टी, शिवसेना ठाकरे गट यांनी अशा आंदोलक विद्यार्थ्यांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे जाहीर केले आहे. कपिल सिब्बल यांनी यासाठी एक फंड उभारण्याचे ठरवले असून स्वतः एक कोटी रुपये दिले आहेत. हे आशादायक चित्र आहे. लोकशाही जगण्यासाठी अशी आंदोलने झाली पाहिजेत. विद्यमान सरकारच्या विरोधात लढण्यासाठीच साधने कमी होत चालली आहेत. प्रस्थापित राजकीय पाट्यांना इडी, सीबीआय वगैरेंचा वापर करून जखडून ठेवण्यात आले आहे. या स्थितीत कॉकरोचसारखे सध्या तरी सत्तेच्या स्पर्धेत नसलेले तरुणच सत्तेला धडक देऊ शकतात व त्यांनी ते दाखवूनही दिले आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी काल आणखी एक कांगावा केला. जंतरमंतरवरच्या गर्दीत दोन हजारांहून अधिक गुंड प्रवृत्तीचे लोक सहभागी झाले होते असे त्यांनी सांगितले. त्यांनी या आंदोलनाच्या वेळी फोटो काढणारे मशीन बसवले होते. त्यात आलेले फोटो सरकारकडच्या आधार व इतर डेटाशी ताडून पाहिले गेले. पोलिसांच्या रेकॉर्डमध्ये शोध घेतला गेला. त्यावरून ही आकडेवारी काढली गेली असून या गुंडांमध्ये हत्या, बलात्कार इत्यादी आरोप असलेले लोकही सामील होते असा दावा पोलिसांनी केला आहे. समजा पोलिसांचे म्हणणे मान्य करून अनेक गुंड आंदोलनस्थळी होते असे गृहित धरले तरी त्यांनी जंतरमंतर किंवा अन्य ठिकाणी कोणतीही गुन्हेगारी कृत्ये केल्याचे दिसत नाही. असते तर पोलिसांनी त्यांना पकडायला हवे होते. आणि, निव्वळ पूर्वीच्या गुन्ह्यांचा दाखलाच द्यायचा झाला तर आपली संसद आणि बहुसंख्य विधानसभांमध्ये सदस्य म्हणून बसणारे प्रतिनिधीही हत्या किंवा बलात्काराच्या गुन्ह्यातले आरोपी असल्याचे दिसेल. त्याचे काय करायचे हे पोलिसांनी व न्यायालयाने सांगाया हवे. थोडक्यात, आंदोलनाला तेव्हा दडपता न आल्याने आता अशा रीतीने बदनाम करण्याचा उद्योग चालू झाला आहे. त्याचा धिक्कार करावा तितका थोडाच.

**| विचार**

# किंचित शुभवार्ता!

**येत्या काळात 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब होणार असल्याचा सामान्यजनांना मोठा फायदा होऊ शकतो, ही पहिली महत्वाची बातमी. रेल्वे कर्मचाऱ्यांना कमी दरात गृहकर्ज मिळणार आणि इलेक्ट्रिक दुचाकी आणि रिक्षांसाठी पन्नास टक्के अनुदान मिळणार, ही बातमीही शुभवार्ता ठरणारी. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचे शेअर बाजारात पुनरागमन होत असल्याचेही संकेत मिळत आहेत.**



महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये अर्थनगरीमध्ये काही सकारात्मक बातम्या पुढे आल्या. सामान्य भारतीयाच्या दृष्टीने त्या महत्वाच्या ठरल्या. येत्या काळात 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब होणार असल्याचा सामान्यजनांना मोठा फायदा होऊ शकतो, ही पहिली महत्वाची बातमी. रेल्वे कर्मचाऱ्यांना कमी दरात गृहकर्ज मिळणार असल्याची आणि इलेक्ट्रिक दुचाकी आणि रिक्षांसाठी पन्नास टक्के अनुदान मिळणार असल्याची बातमीही शुभवार्ता ठरणारी. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचे शेअर बाजारात पुनरागमन होत असल्याचेही संकेत मिळत आहेत.

देशातील सरकारी तेल कंपन्या आता 'एलपीजी'चा अपव्यय कमी करण्यासाठी आणि इंधनाचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची तयारी करत आहेत. 'इंडियन ऑइल', 'भारत पेट्रोलियम' आणि 'हिंदुस्तान पेट्रोलियम' यांसारख्या कंपन्या मोठ्या औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या तंत्रज्ञानामुळे 'एलपीजी'चा अधिक चांगला वापर होईल आणि सिलेंडरमध्ये शिल्लक राहिलेल्या गॅसचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल. सामान्यतः 'एलपीजी' सिलेंडरमधून वाफेच्या स्वरूपात काढला जातो. या प्रक्रियेमुळे सिलेंडरमध्ये काही प्रमाणात 'एलपीजी' शिल्लक राहतो. त्यामुळे इंधनाचा पूर्ण वापर करता येत नाही. 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक' तंत्रज्ञानामध्ये, विशेष उपकरणांचा वापर करून 'एलपीजी' द्रव स्वरूपात काढला जातो. त्यानंतर 'व्हेपोरायझर'द्वारे त्याचे वायूमध्ये रूपांतर केले जाते. यामुळे सिलेंडर जवळजवळ पूर्णपणे रिकामा होतो आणि इंधनाचा अपव्यय कमी होतो. या तंत्रज्ञानाचा फायदा जास्त 'एलपीजी' वापरणाऱ्या उद्योगांना होईल. त्यात हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, केटरिंग, अन्न प्रक्रिया युनिट्स, डेअरी, रासायनिक उद्योग आणि इतर उत्पादन सुविधांचा समावेश आहे. वारंवार आणि मोठ्या प्रमाणात गॅसची आवश्यकता असणाऱ्या संस्थांसाठी हे तंत्रज्ञान खर्च वाचवू शकते आणि कामकाज अधिक कार्यक्षम बनवू शकते.

तज्ज्ञांच्या मते, 'एलपीजी'च्या चोख वापरामुळे ग्राहकांसाठी इंधनाचा खर्च कमी होईल. तेल कंपन्यांना सिलिंडर हाताळणे आणि पुन्हा भरण्याशी संबंधित आव्हानांपासूनही दिलासा मिळू शकेल. यामुळे पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढेल आणि 'एलपीजी' वितरण प्रणाली अधिक प्रभावी होईल. भारतात 'एलपीजी'ची मागणी सातत्याने वाढत आहे. परिणामी, इंधनाच्या प्रत्येक थेंबाचा यथायोग्य वापर करणे हे सरकार आणि तेल कंपन्यांसाठी प्राधान्य बनले आहे. या धोरणाचा एक भाग म्हणून, ऊर्जेचा अपव्यय कमी करण्यासाठी आणि संसाधनांचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन दिले जात आहे. भविष्यात मोठ्या औद्योगिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा वेगाने विस्तार होईल अशी अपेक्षा आहे. यामुळे केवळ औद्योगिक परिचालन खर्च कमी होणार नाही, तर देशात ऊर्जा कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासही मदत होईल.

आता काही सकारात्मक अर्थवार्ता. रेल्वे बोर्डाने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी गृहनिर्माण आगाऊ कर्जाचे व्याजदर निश्चित केले आहेत. नवीन आदेशानुसार रेल्वे कर्मचाऱ्यांना आता घर बांधणीसाठी केवळ ७.१ टक्के वार्षिक व्याजदराने निधी मिळणार आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांवरील 'ईएमआय'चा भार थेट कमी होईल आणि महागाईच्या या काळात त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल. रेल्वे बोर्डाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार नवीन ७.१ टक्के व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत. हा दर ३१ मार्च २०२७ पर्यंत मंजूर होणाऱ्या सर्व गृहनिर्माण आगाऊ कर्जांवर लागू होईल. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने या संदर्भात १३ मे २०२६ रोजी एक निवेदन जारी केले होते. त्याच सरकारी आदेशानुसार रेल्वे बोर्डाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी हा दर तात्काळ प्रभावाने लागू केला आहे. मागील आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २०२५-२६) गृहनिर्माण आगाऊ रकमेवरील व्याजदर वार्षिक ७.४४ टक्के होता. या विशेष सरकारी आगाऊ रकमेचा वापर केवळ तयार घर खरेदी करण्यापुरता मर्यादित नाही. रेल्वे कर्मचारी त्यांच्या गरजेनुसार विविध उद्देशांसाठी याचा वापर करू शकतात. भूखंड खरेदी करून त्यावर नवीन घर बांधण्याचा विचार करत असाल, तर ही रक्कम उपयुक्त ठरेल. बिल्डरकडून राहण्यासाठी तयार फ्लॅट खरेदी करत असाल किंवा केंद्र, राज्य किंवा गृहनिर्माण संस्थेच्या योजनेअंतर्गत घर खरेदी करत असाल, तर या सुविधेचा सर्वत्र उपयोग करू शकता. मालकीचे घर असल्यास कुटुंब वाढल्यावर नवी खोली किंवा मजला जोडायचा असल्यासही या कर्जाचा लाभ मिळेल.

याच सुमारास गोवा सरकारने इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी मोठी घोषणा केली आहे. प्रस्तावित नव्या योजनेनुसार परवानाधारक बाइक टॅक्सी (मोटारसायकल पायलट) आणि ऑटो-रिक्षा चालकांना इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची तयारी सुरू आहे. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले, की हे अनुदान सर्वसामान्य नागरिकांसाठी नसून केवळ परवानाधारक मोटारसायकल पायलट आणि ऑटो-रिक्षा चालकांनाच दिले जाईल. सार्वजनिक वाहतुकीत इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे आणि चालकांचा इंधन खर्च कमी करणे हा या योजनेमागील उद्देश आहे. सरकार केवळ अनुदान देऊन थांबणार नाही. राज्यभरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर सुलभ करण्यासाठी सुमारे ७० नवीन ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्याचीही योजना आहे. त्यामुळे वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा सहज उपलब्ध होईल आणि लांब पल्ल्याच्या प्रवासातही अडचण येणार नाही. गोवा सरकारचे उद्दिष्ट राज्यातील प्रदूषण कमी करणे, पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व घटवणे आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे आहे. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर पारंपरिक इंधनावरील वाहनांच्या तुलनेत कमी खर्चिक असल्याने बाइक टॅक्सी आणि रिक्षा चालकांचे उत्पन्नही वाढण्यास मदत होईल. सध्या ५० टक्के अनुदानाचा प्रस्ताव केवळ गोवा सरकारने मांडला आहे. ही योजना देशभर लागू नाही. इतर राज्यांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांसाठी दिले जाणारे अनुदान त्या-त्या राज्यांच्या ईव्ही धोरणांनुसार आणि केंद्र सरकारच्या योजनांनुसार वेगवेगळे असू शकते.

दरम्यान, सलग सहा महिने विक्रीचा सपाटा लावल्यानंतर परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा भारतीय शेअर बाजारात खरेदी सुरू केली आहे. जुलै महिन्यात आतापर्यंत त्यांनी सुमारे १.८ अब्ज डॉलर किमतीचे भारतीय समभाग खरेदी केले आहेत. या बदलामागे भारतीय अर्थव्यवस्थेतील मोठा बदल नसून जागतिक स्तरावरील कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील गुंतवणुकीचा वेग कमी झाल्याचा परिणाम असल्याचे मत 'जेफरीज'चे 'ग्लोबल हेड ऑफ इक्विटी स्ट्रॅटेजी' क्रिस्टोफर वूड यांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, गेल्या काही महिन्यांमध्ये भारतीय बाजारातून झालेली विक्रमी विक्री ही भारतातील कमकुवतपणामुळे नव्हती. जागतिक गुंतवणूकदारांनी दक्षिण कोरिया आणि तैवानसारख्या देशांमधील 'एआय' आणि तंत्रज्ञान हार्डवेअर कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केल्यामुळे भारतातून पैसा बाहेर गेला होता. वूड यांच्या म्हणण्यानुसार यंदाच्या पहिल्या सहामाहीमध्ये उदयोन्मुख बाजारपेठांमधील फंडांनी भारतीय शेअर्सची विक्री करून सुमारे २९ अब्ज डॉलरची गुंतवणूक 'एआय-केंद्रित' बाजारांमध्ये वळवली; मात्र आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. १५ जुलैपर्यंत 'एफआयआय'ने भारतीय शेअर्समध्ये १.८ अब्ज डॉलरची खरेदी केली असून, फेब्रुवारीनंतरची ही पहिली मासिक निव्वळ खरेदी मानली जात आहे. क्रिस्टोफर वूड यांच्या मते जुलैमधील खरेदी हे जागतिक गुंतवणूकदार 'एआय' कंपन्यांमधून काही निधी काढून इतर बाजारपेठांकडे वळवत असल्याचे संकेत आहेत. 'एआय' क्षेत्रातील तेजीच्या काळात भारतातून पैसा बाहेर गेला होता, तर आता त्या क्षेत्राचा वेग कमी होत असल्याने भारतीय बाजारात पुन्हा गुंतवणूक वाढू लागली आहे; मात्र 'एआय' गुंतवणुकीची लाट शिगेला पोहोचेल किंवा भारतीय शेअर बाजाराचे मूल्यांकन (व्हॅल्युएशन) लक्षणीय प्रमाणात कमी होईल तेव्हाच 'एफआयआय'ची मोठ्या प्रमाणावर आणि सातत्याने पुनरागमन होईल.

**| चर्चा आजची**

# रेवस-रेड्डी महामार्गावर 'सोशल' टीका



संतोष राऊळ

अलिबाग तालुक्यातील रेवस येथून सुरू होणारा मार्ग सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी या ठिकाणी संपणारा रेवस-रेड्डी हा मार्ग सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. काही महिन्यांपूर्वी या महामार्गाचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु, संबंधित ठेकेदाराच्या नियोजन शुन्य कारभारामुळे प्रवासी वर्गासह स्थनिक नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रीया आजही उमटत आहेत. ठेकेदाराने एक मार्ग न धरता आधीमधी रस्त्याचे काँक्रिटीकरण केले आहे. त्यामुळे सुसाट गाड्यांना अचानक ब्रेक लावावा लागत आहे. काही ठिकाणी भर पावसात रस्त्याचे काँक्रिटीकरण केले जात आहे. परंतु, घाईगडबडीत बनविलेला हा रस्ता किती दिवस तग धरून बसेल, असा प्रश्न देखील प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे. अशातच एका नवीन चर्चेने खळबळ उडवली आहे. यावेळी चक्क रेवस-रेड्डी महामार्गाची अलाईनमेंटच बदलल्याची चर्चा रंगली असून, एका सोशल मिडीयाच्या पोस्टवरून सबंधित प्रशासनावर टिका करण्यात आली आहे.

रेवस-रेड्डी हा मार्ग रायगड जिल्ह्यातून सुरू होऊन रत्नागिरीतून जात सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमारेषेवर समाप्त होणार आहे. या महामार्गामुळे तिनही जिल्हे एकमेकांना जलदगतीने जोडले जाणार आहेत. त्यासाठी या मार्गावरील जुन्या रस्त्यांवर काँक्रिटीकरण केले जात आहे तर काही रस्ते नव्याने बनविले जाणार आहेत. तसेच, या रस्त्यामुळे तिनही जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. परंतु, हा रस्ता नियोजन शुन्य परिस्थितीत बनवला जात असल्याने सर्व स्तरातून याबाबत नाराजी व्यक्त होत आहे. अलिबाग तालुक्यातील एक सलग मार्ग न धरता आधीमधी रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी काँक्रिटीकरण करण्यात आलेले नाही त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहे. त्यामुळे भरधाव येणाऱ्या वाहनाला अचानक ब्रेक लावाला लागत आहे. विशेषतः दुचाकी स्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या अंधारात हे खड्डे दिसत नसल्याने मोठ्या अपघाताची शक्यता वर्तविली जात आहे. या मार्गावर बहुतांश ठिकाणी रस्त्याच्या बाजुला मोठ्या प्रमाणात कांदळवन आहेत. त्यामुळे रस्त्याच्या रूंदीकरणासाठी कांदळवन विभागाची परवानगी न मिळाल्यामुळे रस्त्याचे काम रखडले असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे जनसामान्यांत असा प्रश्न उपस्थित होत आहे की, जर अद्याप परवानगी भेटतच नसेल तर या मार्गाच्या उद्घाटनाचा एवढा गाजावाजा करण्याची गरजच काय? लोकप्रतिनिधींनी निवडणूका आल्या की मोठमोठी स्वप्न दाखवायची, आणि निवडणूका संपल्या की असे गारज दाखवायचे, अशा संपप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यातच नवा वाद समोर आला आहे. यावेळी थेट रेवस-रेड्डी महामार्गाची अलाईनमेंटच बदलल्याची चर्चा होत आहे.

अलिबाग तालुक्यात रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या सुमारे २,४०० कोटींच्या प्रकल्पासाठी प्रस्तावित अलाईनमेंट बदलावरून नवा वाद पेटला आहे. रेवस-चोंढी-अलिबाग-रेवदंडा या मूळ मार्गाऐवजी आता रेवस-हाशिवरे-कार्लेखिंड बोगदा-रेवदंडा हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आल्याचा दावा केला जात असून, हा निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतल्याचे लोकप्रतिनिधींकडून उघडपणे सांगितले जात आहे. मात्र, याच दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. व्हायरल पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, मूळ प्रस्तावित मार्गावरील अनेक जमिनी वर्षांपूर्वीच मोठे बिल्डर्स, उद्योगपती आणि धनदांडग्यांच्या ताब्यात गेल्या आहेत. त्यामुळे अलाईनमेंट बदलाचा निर्णय हा खरोखर शेतकऱ्यांच्या हितासाठी होता की प्रभावशाली व्यक्तींच्या मालमत्ता वाचवण्यासाठी, असा सवाल स्थानिकांमधून उपस्थित करण्यात आला आहे. याआधी नुसती चर्चा होती की, रेवस-रेड्डी हा मार्ग धनदांडग्यांच्या आणि मोठ्या व्यावसायिकांच्या हितासाठी बनविला जात आहे. परंतु, आता या महामार्गाची अलाईनमेंटच बदलाच्या चर्चेमुळे त्यावर शिक्कामोर्तबच असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, यामार्गावरील रेवस-चोंढी या मार्गावर मोठ्या प्रमाणात शेती असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी या मार्गाची अलाईनमेंट बदलून रेवस-हाशिवरे-कार्लेखिंड बोगदा-रेवदंडा हा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. मात्र, संबंधित सोशल मीडिया पोस्टमध्ये नव्या प्रस्तावित हाशिवरे-कार्लेखिंड मार्गावर आजही मोठ्या प्रमाणात आंबा, काजू आणि इतर बागायती क्षेत्र असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे एका भागातील शेतकऱ्यांचे संरक्षण आणि दुसऱ्या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान, हा कसला न्याय? अशी विचारणा आता नागरिकांकडून होत आहे. याशिवाय, दोन्ही अलाईनमेंटमधील बाधित शेतजमिनी, बागायती, घरे आणि इतर मालमत्तेचा अधिकृत तौलनिक अहवाल सार्वजनिक करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. सोशल मीडियावर सुरू असलेल्या या चर्चेमुळे महामार्गाच्या अलाईनमेंट बदलाचा निर्णय पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

तसेच, नव्या प्रस्तावित मार्गावर आजही मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष शेती, आंबा-काजूच्या बागा आणि स्थानिक बागायतदार आहेत. त्यामुळे एका भागातील शेतकरी वाचले आणि दुसऱ्या भागातील शेतकरी बळी गेले का? असा सवाल या पोस्टमधून उपस्थित करण्यात आला आहे. याशिवाय मांडवा-अलिबाग आणि पेझारी-अलिबाग मार्गावरील तीव्र वाहतूक कोंडी, शहर नियोजन, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीकाही या पोस्टमध्ये करण्यात आली आहे.

**लोकसंसद**

### मानवी स्वातंत्र्याचा जागतिक मापदंड!

अमेरिकेतील वॉशिंग्टन, डी.सी. येथे मुख्यालय असलेले कॅटो इन्स्टिट्यूट आणि कॅनडातील व्हँकुव्हर येथील फ्रेझर इन्स्टिट्यूट या दोन स्वातंत्र्यवादी आणि अभिजात उदारमतवादी विचारसरणी असलेल्या संस्थांकडून संयुक्तपणे २०१५ सालापासून दरवर्षी 'मानवी स्वातंत्र्य निर्देशांक' (ह्युमन फ्रीडम इंडेक्स) प्रकाशित केला जातो. 'मानवी स्वातंत्र्य निर्देशांक' हा वैयक्तिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वातंत्र्य या दोन मुख्य निकषांवर आधारित १२ विविध श्रेणींमधील एकूण ८६ निर्देशकांचे मूल्यांकन करून निश्चित केला जातो आणि त्याद्वारे प्रत्येक देशाला ० ते १० या श्रेणीतील गुण दिले जातात. १६५ देशांच्या या यादीत स्वित्झर्लंडने ९.१४ गुणांसह अव्वल स्थान मिळवले आहे. न्यूझीलंड आणि डेन्मार्क ९.०३ गुणांसहअनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. तर एस्टोनिया (८.९५) चौथ्या आणि आयर्लंड (८.९१) पाचव्या क्रमांकावर आहेत. ६.२६ गुणांसह भारत ११० व्या क्रमांकावर आहे. कॅनडा ८.७४ गुणांसह आणि अमेरिका (८.७१ गुण) अनुक्रमे बाराव्या आणि पंधराव्या क्रमांकावर आहेत. तर पाकिस्तान (५.२६) गुणांसह १३७ व्या आणि चीन (४.९३ गुण) १४९ व्या क्रमांकावर आहेत. ३.२७ गुणांसह शेवटच्या १६५ व्या क्रमांकावर सीरिया आहे. वैयक्तिक स्वातंत्र्य आणि आर्थिक अधिकार या निकषांचा एकाच मोजमापात समावेश केल्यामुळे 'मानवी स्वातंत्र्य निर्देशांक' हा मानवी स्वातंत्र्याचा सर्वात सर्वसमावेशक जागतिक मापदंड मानला जातो. त्यामुळे देशा-देशांतील संबंध विचारपूर्वक दृढ करण्यासाठी या निर्देशांकाचा उपयोग होतो.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**| दिनविशेष**

# संपूर्ण माळीण गाव केलं मातीच्या ढिगाऱ्याखाली

महाराष्ट्रासाठी ३० जुलै हा दिवस कधीही न विसरणारा आहे. मागील १२ वर्षांपूर्वी भिमाशंकर जवळील आंबेगाव तालुक्यातील माळीणमध्ये भीषण दुर्घटना घडली होती. माळीण गावच्या डोंगरात स्फोटकसदृष्य आवाज झाला आणि पूर्ण गाव मातीखाली गाडलं गेलं. मातीचा ढिगारा, चिखल व उन्मळलेली झाडे अचानक खाली घसरून येवू लागली. डोंगर कोसळला, दरड कोसळली आणि मातीच्या ढिगाऱ्याखाली मूळ गावातील ७४ पैकी ४४ घरे दाबली गेली. जवळजवळ संपूर्ण गाव ढिगाऱ्याखाली गाडलं गेलं. या घटनेला आज १२ वर्षे पूर्ण झाली आहे.आजच्याच दिवशी पुणे जिल्ह्यातील घडलेल्या एक घटनेने केवळ महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देश हादरला होता. रात्री गाढ झोपेत असताना काळाने घाला घातला आणि हसतं-खेळतं टुमदार गाव उद्ध्वस्त झालं. तब्बल १५१ गावकऱ्यांनी झोपेतच शेवटचा श्वास घेतला. ही बाब पसरताच महाराष्ट्र हादरून गेला होता. पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात असणाऱ्या माळीणची दुर्घटना अनेकांच्या आयुष्यात कायम ची व्रण ठेवून गेली. आज या घटनेला बारा वर्ष पूर्ण झाली. मात्र अजूनही या भागातील आदिवासी जनतेच्या मनातून त्या घटनेची भीती कायम आहे. १५१ बांधवांचा जीव घेणारी ही दुर्घटना शत्रूच्याही वाट्याला येऊ नये अशीच मागणी कोणाकडूनही केली जाईल. या ठिकाणी माळीण गावाचं पुनर्वसन तर झालं मात्र जी माणसं गेली जे गाव याच्यामध्ये संपूर्ण नष्ट झालं त्याच्या आठवणी अजूनही तशाच आहेत. मंचरकडून आहुपे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर डिंभे धरणाच्या अगदी आत सत्तावीस किलोमीटरवर असणार छोटसं माळीण गाव... एरवी कधीही कोणाच्या लक्षातही आलं नसतं मात्र या गावावर दरड कोसळली आणि एक नवे दोन नव्हे तर तब्बल १५१ लोक यात गाडली गेली. ही घटना जेव्हा जगासमोर आली तेव्हा जग निश्चितच हळहळत होतं.. मात्र ही घटना पहिल्यांदा समोर आली ती एका एसटी ड्रायव्हरमुळे आणि इथून पुढे प्रशासनासह सगळ्यांचीच धावपळ उडाली. सर्वत्र एकच आक्रोश सुरू असताना येथील एका घरातील लहानग्याने आपल्या आईला घट्ट मिठी मारली होती. इथे मदत कार्य करणाऱ्या तरुणांच्या नजरेला हे दृश्य पडलं...त्यांनी ताबडतोब हालचाल करून ढिगाऱ्या खालून आईला दोन महिन्यांच्या रुद्रासह बाहेर काढलं. आता हा रुद्र पाचवीमध्ये आहे. अशा एक ना अनेक कहाण्या या माळीनच्या दुर्घटनेसोबत जोडल्या गेल्या आहेत. आता या रुद्रला त्या आठवतही नाहीत. मात्र याच्या सारखीच अनेक लहान मुलं या कथा ऐकत मोठी होत आहेत. दिलीप लेंभे हे पत्नी, भाऊ, भावजय आणि त्यांची चार मुले यांच्यासह माळीणमध्ये राहत होते. डोंगर कुशीमध्ये असणाऱ्या भात शेतीवरच ते पोटाची खळगी भरत होते. त्या दिवशी सकाळी भात शेतीच्या काही कामासाठी ते बाहेर पडले आणि हा डोंगर कोसळला. या दुर्घटनेत त्यांच्या कुटुंबातील तब्बल दहा जणांचा जीव गेला. आजही या डोंगर कपाऱ्यांमधील अशीच काही गावं आजही भीतीच्या छायेखाली वावरत आहेत. नुकतेच माळीणच्या वरच्या बाजूला असलेल्या कुंभेवाडी जवळील घाटामध्ये दरड कोसळली होती. अशाच पद्धतीच्या छोट्या मोठ्या दरडी या भागात कोसळत असतात. जेव्हा अधिकचा पाऊस होतो तेव्हा येथील गावकऱ्यांच्या हृदयाचे ठोके वाढतात. त्यामुळे प्रशासनाने डोंगर कुशीमध्ये असणाऱ्या गावांची वेळीच दखल घेणं देखील गरजेचे आहे. पुन्हा असं माळीण होणं आपल्याला परवडणार नाही.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० जुलै

१) श्रीम. सुरेखा अविनाश बि... अलिबाग, ३०-७-१९४८
२) श्री. युधिष्ठीर जगदीश त्यागी चेंढरे-अलिबाग, ३०-७-१९५४
३) श्री. विवेकानंद नारायण भागवत कुरूळ, अलिबाग, ३०-७-१९६२
४) छगनलाल शेषमल ओसवाल अलिबाग, ३०-७-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# अमरवीरांना अश्रुपूर्ण मानवंदना

## ● शिपुरकर, वाघरे शाळेत देशभक्तीचा जागर ● शहीदांच्या स्मरणाने अनेकांचे डोळे पाणावले

| माणगाव | प्रतिनिधी |

देशासाठी जगणे मोठे असते; पण देशासाठी हसत-हसत मरण पत्करणे त्याहूनही मोठे असते. या भावनेची प्रचिती देणारा, प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करणारा आणि कारगिलच्या अमर वीरांच्या बलिदानाची जाणीव करून देणारा कारगिल विजय दिवस माणगाव शहरातील शिपुरकर आणि वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मंगळवारी (दि.२८) जुलै रोजी देशभक्तीने भारलेल्या वातावरणात साजरा करण्यात आला.

संपूर्ण विद्यालयात तिरंग्याचा अभिमान, शहीदांविषयीची कृतज्ञता, राष्ट्रभक्तीची भावना ओसंडून वाहत होती. प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यांत देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द दिसत होती, तर प्रत्येक घोषणेत मातृभूमीप्रती असलेले प्रेम आणि अभिमान स्पष्ट जाणवत होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांचे सर्वोच्च बलिदान देणाऱ्या अमर जवानांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शहीदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. याप्रसंगी संपूर्ण सभागृहात एक अनामिक शांतता पसरली होती. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. देशासाठी हसत-हसत मृत्यूला कवटाळणाऱ्या त्या वीरांची आठवण प्रत्येकाच्या मनाला चटका लावून गेली.

यानंतर माजी सैनिक प्रतिक मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि आकर्षक परेड सादर केली होती.

प्रत्येक पावलात सैनिकांची शिस्त, प्रत्येक सलामीत देशाप्रती असलेला सन्मान आणि प्रत्येक हालचालीत राष्ट्रसेवेची प्रेरणा दिसून येत होती. भारत माता की जय..., वंदे मातरम.., शहीद जवान अमर रहे..., जय जवान... जय हिंद... या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

यावेळी प्रतिक मोरे यांनी कारगिल युद्धातील भारतीय सैन्याचे अतुलनीय शौर्य, हिमाच्छादित डोंगरांवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लढलेले युद्ध, शत्रूला दिलेले चोख प्रत्युत्तर आणि विजयासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांच्या बलिदानाच्या कथा विद्यार्थ्यांसमोर उलगडल्या. या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्तीचे प्रज्वलित झाले.

अनेक विद्यार्थ्यांनी भविष्यात सैन्यात भरती होऊन देशसेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला. शिस्त, कर्तव्य, त्याग, राष्ट्रप्रेम आणि देशसेवा हीच खरी जीवनमूल्ये असल्याची जाणीव या कार्यक्रमातून प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात दृढ झाली.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक तथा कमांडो ट्रेनिंग फोर्सचे प्रतिक मोरे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका मनिषा मोरे, दिलीप उभारे, राजेंद्र सुर्वे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



### तिरंग्याला मानवंदना

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी उभे राहून तिरंग्याला मानवंदना दिली आणि शहीद वीरांच्या स्मृतीला वंदन केले. त्या वेळी वातावरण इतके भावनिक झाले होते की, अनेकांच्या डोळ्यांत नकळत अश्रू दाटून आले. कारण प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती. कारगिलच्या त्या अमर वीरांनी आपल्या रक्ताने भारताचा तिरंगा उंच ठेवला... त्यांच्या त्यागामुळेच आज आपण सुरक्षित आहोत. त्यांचे बलिदान कधीही विसरले जाणार नाही.

## पाणजेत स्वच्छता अभियान उत्साहात

| उरण | प्रतिनिधी |

नवतरुण मित्र मंडळ, पाणजे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षा सहलीचे औचित्य साधून वृक्षारोपण तसेच शिवमंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाच्या सदस्यांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच शिवमंदिर परिसराची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा आदर्श निर्माण केला आहे. यावेळी अक्कादेवी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात आर. झुंजारवाला ट्रस्टचे डॉक्टर व सहकारी, लकपती पाटील, अविनाश पाटील, दर्शन पाटील, हेमंत पाटील, चंद्रकांत पाटील, विश्वनाथ पाटील, अरुण पाटील, जितेंद्र पाटील, ॲड. विक्रम पाटील, मिलिंद पाटील, मंजीत पाटील, दीपेश पाटील, नंदलाल पाटील, सुशांत पाटील, सुनील पाटील, सचिन भोईर, महेंद्र पाटील, प्रकाश पाटील, लहुराज भोईर उपस्थित होते.



## नांदगाव प्राथमिक शाळेत वह्या वाटप

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा क्रमांक १ मध्ये म्हसळा-खरसई येथील सोमजाई क्रीडा मंडळातर्फे महेंद्र चौलकर यांच्या सहकार्यातून चंद्रकांत खोत तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

याप्रसंगी काशिनाथ पयेर, नरेश कातळकर, राम मांदारे, काशिनाथ कोकाटे, क्रीडा प्रमुख लक्ष्मण पाटील, हिराजी पाटील, मेघा कुलकर्णी, मेघा कोतवाल, मुख्याध्यापक हेमंत नांदगावकर, आश्विन राठोड, नितेश राऊत शिक्षकवृंद यावेळी उपस्थित होते.

## डॉ. महेश यशदीप वास्तु पुरस्काराने सन्मानित

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

डॉ. महेश निमणे यांना राष्ट्रीय यशदीप वास्तु कर्तव्य पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. हा पुरस्कार सोहळा पत्रकार भवन, पुणे येथे उत्कर्ष भारत आयोजित भव्य सन्मान सोहळ्यात वास्तुशास्त्र क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले आणि ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




या प्रतिष्ठेच्या पुरस्कारामध्ये मानाची पगडी, शाल आणि सन्मानपत्र देऊन डॉ. निमणे यांचा सन्मानित करण्यात आले. आजपर्यंत त्यांना विविध संस्थांकडून ४५ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, समाजहित आणि वास्तुशास्त्र क्षेत्रातील संशोधन व मार्गदर्शनाचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात पुढे सुरू राहील, अशी अपेक्षा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास डॉ. खरात, आसरा फाऊंडेशन, ओम पब्लिकेशनचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच शेकडो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. महेश निमणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वास्तुशास्त्र विषयात संशोधन, मार्गदर्शन आणि जनजागृतीचे कार्य सातत्याने केले आहे.

## झेनिथ धबधब्यावर अडकलेल्या पर्यटकांची सुटका

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील झेनिथ धबधब्यावर फिरण्यासाठी गेलेले ७० हून अधिक पर्यटक रविवारी दुपारी मुसळधार पावसानंतर नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अडकून पडले. घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलीस स्टेशन, खोपोली नगरपालिकेचे अग्निशमन दल आणि हेल्प फाऊंडेशनच्या बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत सर्व पर्यटकांची सुखरूप सुटका केली.

अडकलेल्या पर्यटकांमध्ये दीड वर्षांच्या बालकापासून ते ६० ते ६५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश होता. पाण्याचा वेग वाढल्याने पर्यटकांना परतीचा मार्ग बंद झाला होता. त्यामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

बचाव पथकाने दोरीच्या सहाय्याने पर्यटकांना एकामागून एक सुरक्षित बाहेर काढले. लहान बालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना बचाव कर्मचाऱ्यांनी पाठीवर घेऊन सुरक्षित स्थळी पोहोचवले. सर्व यंत्रणांच्या समन्वयामुळे कोणतीही जीवितहानी न होता मोठा अनर्थ टळला.

दरम्यान, पावसाळ्यात धबधबे, ओढे आणि नदीकाठच्या पर्यटनस्थळी पाण्याची पातळी अचानक वाढू शकते. त्यामुळे पर्यटकांनी केवळ मौजमजेसाठी जीव धोक्यात न घालता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन बचाव पथक व पोलिसांनी केले आहे.

## मोबाईलच्या दुष्परिणामांबद्दल मार्गदर्शन


| खांब | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांमध्ये वाढते मोबाईलचे व्यसन, अभ्यासावरील कमी होत चाललेले लक्ष आणि करिअरविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कोलाड स्थानिक पोलीस विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रबोधनपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा अतिरेक वापर शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासावर कसा विपरीत परिणाम करतो, याची विविध उदाहरणांसह सविस्तर माहिती दिली. उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्य, शिस्त आणि वेळेचे योग्य नियोजन अत्यंत आवश्यक आहे, असे सांगत विद्यार्थी दशेतच चांगले छंद जोपासणे, वाचनाची आवड निर्माण करणे, खेळ व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होणे यावर विशेष भर देण्यात आला.

## माथेरानमध्ये ब्लिचिंग पावडरची फवारणी

| कर्जत | प्रतिनिधी |

माथेरानमध्ये मान्सूनपूर्व काळात जंतुनाशक औषधांची फवारणी, ब्लीचिंग पावडर टाकणे, धूप प्रतिबंधक बंधारे उभारणे आदी आवश्यक उपाययोजना होणे अपेक्षित असताना, यंदा अशा कामांच्या पूर्वतयारीचा अभाव दिसून आल्याचा आरोप शिवसेना (उबाठा) पक्षाचे नगरसेवक सचिन दाभेकर यांनी केला आहे.



या संदर्भात नगरपरिषदेच्या सभेत तसेच अधिकृत व्हॉट्सॲप समूहावर वारंवार सूचना करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रभाग क्रमांक ५ मधील संत रोहिदास नगर आणि पंचशील नगर येथील पेव्हर ब्लॉक रस्त्यांवर शेवाळ साचल्यामुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेऊन दाभेकर यांनी स्वतः च्या खर्चातून त्या रस्त्यांवर ब्लिचिंग पावडर टाकण्याचे काम केले.

# पनवेल वाहतूक शाखेचा विशेष सत्कार

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी|

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील संवाद हॉलमध्ये जिल्हास्तरीय बाल सुरक्षा व वाहतूक विषयक महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित शालेय वाहतुकीसाठी विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच नागरिकाभिमुख कार्याबद्दल पनवेल शहर वाहतूक शाखेचा विशेष सत्कार करण्यात आला.



या बैठकीस पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) राहुल खाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) गावडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याशिवाय विविध शाळांचे मुख्याध्यापक, शाळा प्रतिनिधी, शालेय बस मालक, ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स व संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

बैठकीत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी शालेय वाहनांमध्ये GPS प्रणाली अनिवार्य करणे, अग्निसुरक्षा नियमांचे पालन, डिजिटल उपस्थिती प्रणाली, सीसीटीव्ही फुटेज किमान तीन महिने जतन करणे, नियमित विद्यार्थी-पालक बैठकांचे आयोजन, चालकांचे वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, सहा वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी महिला अटेंडंटची नियुक्ती तसेच प्रत्येक चालकाने दरवर्षी पोलीस क्लिअरन्स सर्टिफिकेट सादर करणे आदी महत्त्वाच्या सूचनांची माहिती दिली.

यावेळी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त दीपक साकोरे आणि पोलीस उपायुक्त राहुल खाडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

**खाडीच्या माशांना खवय्यांची मागणी | ५०० ते ७०० रुपये किलोचा भाव**

# ताज्या मासळीला सुगीचे दिवस

| चिपळूण | प्रतिनिधी |

ताजा खाडीचा तांबोशी घ्या, जिवंत कोळंबी आहे, अशा हाका मारत सध्या दाभोळ आणि वाशिष्ठी खाडीतील माशांची विक्री सुरू आहे. ५०० ते ७०० रुपये किलोदराने माशांची किरकोळ विक्री केली जात आहे. बाजारात समुद्रातील मासळीची टंचाई निर्माण झाली असताना खाडीतील माशांना प्रचंड भाव आला आहे. वाशिष्ठी आणि दाभोळ खाडीमध्ये सध्या विविध प्रकारची दर्जेदार मासळी मुबलक प्रमाणात मिळू लागली आहे. त्यामुळे मासळी बाजारात खाडीच्या माशांनी खवय्यांची मागणी पूर्ण केली असून, स्थानिक मच्छिमारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



खाडीतील मासेमारी पूर्णपणे भरती आणि ओहोटीवर अवलंबून असते. त्यामुळे मच्छिमारांची वेळ रोज बदलत राहते. मच्छिमार आपल्या छोट्या होडीने किंवा डबक्याने खाडीच्या अशा भागात जातात. काही मच्छिमार मोठे जाळे टाकून चार ते पाच तास वाट पाहतात. काहीजण ओहोटीच्या वेळी चिखलात जाळे लावतात.

खाडीचे पाणी स्वच्छ झाल्यामुळे खाडीत रेणवी, तांबोशी यासारखे महागडे मासे मोठ्या प्रमाणात सापडत आहेत. काही ठिकाणी २ ते ३ किलो वजनाचे मोठे मासे मच्छिमारांच्या जाळ्यात मिळत आहेत. समुद्रातील मासे उपलब्ध नसल्याने खवय्ये खाडीच्या माशांवर तुटून पडत आहेत. ग्राहकांकडून वाढलेल्या या मागणीमुळे खाडीच्या माशांना सध्या बाजारात ५०० ते ७०० रुपये प्रतिकिलो इतका विक्रमी दर मिळत आहे.

प्रदूषण घटल्याने माशांचे प्रमाण वाढलेदाभोळ आणि वाशिष्ठी खाडीपरिसर पूर्वी लोटे परशुराम एमआयडीसीच्या रासायनिक सांडपाण्यामुळे त्रस्त होता. यामुळे स्थानिक मच्छिमारांचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला होता; मात्र, स्थानिक ग्रामस्थ आणि मच्छिमारांनी प्रदुषणाविरोधात दिलेल्या तीव्र संघर्षानंतर आता परिस्थिती सुधारली आहे. प्रदूषण नियंत्रण यंत्रणांवर आलेल्या दबावामुळे खाडीच्या पाण्याचा दर्जा सुधारला असून, घटलेले माशांचे प्रमाण आता पुन्हा वाढू लागले आहे. जेटीवर माशांचा लिलाव जाळ्यात अडकलेले मासे बाहेर काढले जातात. होडीमध्येच रेणवी, तांबोशी, कोळंबी, खेकडे हे मासे वेगवेगळ्या टोपल्यांमध्ये वेगळे केले जातात. कारण, वेगवेगळ्या माशांना बाजारात वेगळा भाव असतो. मासे पकडून मच्छिमार दाभोळ किंवा धोपावेसारख्या स्थानिक किनाऱ्यावर परत येतात. किनाऱ्यावर आधीच स्थानिक महिला वाट पाहत असतात.

> दाभोळ खाडीत अधूनमधून रासायनिक पाणी येते त्यामुळे चिंता वाढते; मात्र काही दिवसांपासून स्थानिक जातीचे मासे चांगल्या प्रकारे मिळत आहेत त्यामुळे रोजची कमाईसुद्धा चांगली होत आहे.
> -गणेश कासेकर, सोनगाव, खेड.

## निवडक



### अनिल खामकर सेवानिवृत्त

**कोलाड :** रोहा तालुक्यातील ऐनवहाळ गावातील अनिल विठोबा खामकर नियत वयोमनानुसार एकूण ३७ वर्षे ५ महिने ९ दिवसांनी सेवानिवृत्त झाले. ते २१ जानेवारी १९८९ रोजी मजूर (रोड कामगार) उपअभियंता रोहा, १ नोव्हेंबर १९९४ रोजी प्रा.आ. केंद्र जांभूळपाडा शिपाई, १जून १९९९ रोजी कनिष्ठ सहाय्यक पं. स. पाली, २०जून २०११ रोजी कनिष्ठ सहाय्यक पं. स. तळा,१९ जून २०२० कनिष्ठ सहाय्यक पं. स. पाली,९ फेब्रुवारी २०२१ रोजी वरिष्ठ सहाय्यक पं. स. रोहा शिक्षण विभाग अशा विविध ठिकाणी विविध पदावर काम करून ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांनी नोकरी सांभाळून गावातील तसेच कोलाड परिसरात सामाजिक कामात सक्रिय असणारे एक आदर्श व्यक्ती म्हणून सर्वांना परिचित आहेत. सेवानिवृत्तीच्या प्रसंगी पांडुरंग महाबळे, सुरेश धामणसे, सुनिल महाबळे, प्रभाकर पवार, ज्ञानेश्वर मालुसरे, नारायण शिंदे, संभाजी निबरे, सागर सिंग, रुपेश झावरे यांनी त्यांचा सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### ताईबाई ठाकूर यांचे निधन



**चिरनेर :** उरण तालुक्यातील कंठवली येथील ताईबाई महादेव ठाकूर (७२) यांचे नुकतेच निधन झाले आहे. उद्योजक बी एम ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत. सामाजिक व धार्मिक कार्यात नियमित सहभागी होणाऱ्या ताईबाई ठाकूर यांनी अनेकांशी माणुसकीचे नाते जोडले होते. त्यांच्या पश्चात पती, तीन मुलगे, दोन मुली, सुना व नातवंडे असा आप्त परिवार आहे.




### जिल्हा परिषद शाळेत छत्र्यांचे वाटप

**नेरळ :** पिंपळोली ग्रामपंचायतीमधील माजी सदस्य रोहिदास माळी यांच्या माध्यमातून तळवडे आणि भाकरीपाडा गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या आणि दोन्ही गावातील अन्य शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी छत्री वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. तळवडे आणि भाकरी पाडा येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये आयोजित कार्यक्रमास कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती एकनाथ धुळे तसेच कर्जत पंचायत समिती माजी सदस्य सुनील घोडविंडे, बाबुराव माळी, आत्माराम धुळे, अरुण विरले, तानाजी मसने, भास्कर मसणे, शांताराम शेळके, कृष्णा शेळके, आत्माराम घोडविंदे, आदी मान्यवर उपस्थित होते. दोन्ही जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आणि गावातील विद्यार्थी अशा २५० जणांना छत्र्या वाटप करण्यात आल्या. यावेळी रोहिदास माळी यांनी विद्यार्थ्यांचे शिक्षण हेच आपल्या समाजाचे भविष्य असून त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन अशा प्रकारचे उपक्रम राबविणे ही आपली जबाबदारी असल्याचे सांगितेल.



### रोहा एसटी आगारात स्वच्छता यंत्रणेचे लोकार्पण

**चणेरा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) गेली तब्बल ७८ वर्षे महाराष्ट्रातील दुर्गम खेड्यापाड्यांपासून शहरांपर्यंत नागरिकांना अखंड प्रवासी सेवा देत आहे. १ जून १९४८ रोजी सुरू झालेली ङ्गलाल परीफ आजही लाखो प्रवाशांसाठी जीवनवाहिनी ठरली आहे. बदलत्या काळानुसार प्रवासी सुविधांमध्ये सातत्याने सुधारणा करण्याच्या दिशेने महामंडळाने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत रोहा एसटी स्थानकात अत्याधुनिक स्वच्छता यंत्रणा कार्यान्वित केली आहे. रोहा बस स्थानक येथे आधुनिक स्वच्छता साहित्य व यांत्रिक उपकरणांच्या लोकार्पणाचा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. रोहा-अष्टमी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते या अत्याधुनिक उपकरणांचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे रोहा बस स्थानकातील स्वच्छतेच्या दर्जामध्ये मोठी सुधारणा होणार असून प्रवाशांना अधिक स्वच्छ, आरोग्यदायी आणि सुखद वातावरण उपलब्ध होणार आहे. यावेळी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, राजेंद्र जैन, महेंद्र दिवेकर, शिक्षण, रवींद्र चाळके, महेश कोलटकर, महेंद्र गुजर, समीर शेडगे, प्रषित बारटक्के, स्वप्नील धनावडे यांच्यासह महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी आणि मोठ्या संख्येने रोहेकर नागरिक उपस्थित होते.



### वैश्य वाणी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**नवीन पनवेल :** वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा वैश्य समाज युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मनोज महादेव आंग्रे पुरस्कृत जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा २६ जुलै रोजी जेष्ठ नागरिक संघ हॉल, पनवेल येथे संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. संतोष कामेरकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात दिशा दाखवणारे मार्गदर्शन केले. याप्रसंगी विष्णू सातवसे, खाडे, मेजारी, नितीन पानसरे, दीपक खेडेकर, राजेंद्र फक्के, हर्षला तांबोळी, योगेश तांबोळी, उमेश मनोरे, प्रकाश मनोरे, प्रकाश चौधरी, दिलीप आंग्रे, लाड, स्वराली साईकर, पूजा साखरे, सुनील शेटे, प्रदीप दलाल, सर्वेश दलाल, प्रवीण जगे, विजय आंग्रे, महेश आंग्रे आशिष आंग्रे, महेश आंग्रे, सुनील चंबावडे व जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. मालती मधुसूदन पोटे (कोप्रोली, उरण) स्मृतीप्रित्यर्थ उखाणा स्पर्धांचा बक्षीस समारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पोटे, संतोष चौधरी व राजेंद्र चौधरी यांनी केले.

## निवडक



### गुरुपौर्णिमेनिमित्त साई संस्थानात गर्दी

**खांदा कॉलनी** : गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त पनवेल एसटी डेपो शेजारील साई संस्थानात बुधवारी सकाळपासूनच साईभक्तांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली. संपूर्ण मंदिर परिसर साई रामच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता. पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. साईबाबांच्या समाधी व मूर्तीवर गुलाबपुष्प अर्पण करून भाविकांनी मनोभावे प्रार्थना केली. अनेक भक्तांनी आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धी, आरोग्य तसेच सर्वांच्या कल्याणासाठी साईचरणी प्रार्थना अर्पण केली. गुलाबपुष्प अर्पण करताना आणि साईनामाचा जप करताना भाविकांच्या चेहऱ्यावर श्रद्धा, भक्ती आणि समाधान स्पष्टपणे दिसून येत होते. गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम, साईनाम जप तसेच आरतीचे आयोजन करण्यात आले होते.



### पनवेलच्या स्वामी समर्थ मठात मंत्रोच्चार

**खांदा कॉलनी** : गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त पनवेल गावदेवी मंदिराशेजारील स्वामी समर्थ मठात बुधवारी पहाटेपासूनच भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली. सकाळपासून मठ परिसरात भक्तांच्या दर्शनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मठामध्ये श्री स्वामी समर्थ या नाममंत्राचा अखंड जयघोष सुरू होता. मंत्रोच्चार, भजन आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला होता. विविध भागांतून आलेल्या भाविकांनी स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन गुरुचरणी नतमस्तक होत कुटुंबाच्या सुख-समृद्धीची प्रार्थना केली. मठ प्रशासनाने दर्शनासाठी सुयोग्य नियोजन केल्यामुळे भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेता आले. गुरुपौर्णिमेनिमित्त दिवसभर भक्तांची सतत गर्दी सुरू असून परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळत आहे.



### बालसंस्कार केंद्रात गुरुपौर्णिमा साजरी

**नवीन पनवेल** : विश्व हिंदू परिषद, मातृशक्ती आयाम, तळोजा प्रखंड यांच्या वतीने लोकनाथ शिव मंदिर तळोजा येथे गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त बालसंस्कार केंद्रात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. या निमित्ताने श्लोक वाचन स्पर्धा तसेच गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी धन्यवाद कार्डनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात आली. बालसंस्कार केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मुलांनी सादर केलेले श्लोक व स्वतः तयार केलेली आकर्षक धन्यवाद कार्ड उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरली. यावेळी मीनाक्षी अग्रवाल, मधुरीमा सिंग, प्रशांत सावंत, रुपेश केणी, प्रियांका शर्मा, तेजश्री केणी, हेमा साहू, नम्रता सिंह उपस्थित होते.

### नारायण बाबा आश्रमात धार्मिक विधी

**पनवेल** : पनवेल येथील स्टेशन रोडवरील साई नारायण बाबा आश्रम आणि साईबाबा मंदिरात गुरु पौर्णिमा उत्सव बुधवारी अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. परमपूज्य सद्गुरू साई नारायण बाबा यांच्या पावन सान्निध्यात झालेल्या या सोहळ्यास पनवेलसह राज्यातील विविध भागांतून आलेल्या साईभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सकाळी अभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर मंत्रोपदेश, महाचरण पूजा, सामूहिक प्रार्थना आणि विविध धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात पार पडले. गुरु पौर्णिमेनिमित्त भाविकांनी सद्गुरूंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत आशीर्वाद घेतले. उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. तसेच आश्रमात आलेल्या प्रत्येक साईभक्ताला आयोजकांच्या वतीने साईरक्षा भेट देण्यात आली. दिवसभर आश्रम परिसरात भक्तिरस ओसंडून वाहत होता.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. **मोबाईल** : ७५५९१८४६१२
- **नोकरीची सुवर्णसंधी – दिशा पॅथॉलॉजी, अलिबाग येथे महिला / ज्येष्ठ नागरिक महिला यांच्यासाठी संधी. पद: रक्त नमुना (Blood Sample) संकलन कामाची वेळ: सकाळी ७:३० ते दुपारी १:०० प्रवास: पनवेल अलिबाग अप-डाउन अधिक माहितीसाठी संपर्क करा : ८५५२८५५२८८**
- **पाहिजेत – अनुभवी पिक-अप ड्रायवर/सोलार काम करणारे इलेक्ट्रीशन अनुभवी-आणि हेल्पर शिक्षणाची अट नाही. V.R.Enterprises Alibag 8888605259 / 8208140619 ( savitri perl Building Ram Mandir) (Bramhan Ali)**
- अलिबागमधील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये नर्स पाहिजे. **(ANM, GNM)** मो.८७८८७३१६०८

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# विजेच्या स्मार्ट मीटरवर सरकारची दुटप्पी भूमिका

**|| आश्वासने एकीकडे, कारवाई दुसरीकडे || वीज ग्राहकांमध्ये संताप**

**| माणगाव | प्रतिनिधी |**

राज्यात स्मार्ट वीज मीटरच्या मुद्द्यावर दिवसेंदिवस संभ्रम वाढत असून, शासनाकडून दिल्या जाणाऱ्या आश्वासनांमध्ये आणि प्रत्यक्षात सुरू असलेल्या कार्यवाहीमध्ये विसंगती दिसून येत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, लाखो वीज ग्राहकांमध्ये अस्वस्थता, संताप आणि भविष्यातील वीजबिलांबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रणधीर महादेव कनोजे यांनी आपल्या परिसरात बसविण्यात आलेले स्मार्ट वीज मीटर काढून पूर्वीप्रमाणे जुने वीज मीटर पुन्हा बसविण्यात यावेत, या मागणीसाठी १ ऑगस्ट २०२६ पासून बेमुदत उपोषणाचा इशारा दिला होता.



त्यांच्या मागणीची दखल घेत महावितरणने २४ जुलै २०२६ रोजी लेखी उत्तर दिले असून, केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत आणि वीज कायदा २००३, केंद्रीय विद्युत प्राधिकरण तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगांच्या नियमांनुसार राज्यात स्मार्ट मीटर टप्प्याटप्प्याने बसविण्याचे काम सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे.

यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांसमोर अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. शासनातील जबाबदार लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांकडून अनेक वेळा स्मार्ट मीटर बसविणे बंधनकारक नाही असे आश्वासन देण्यात आले. मात्र दुसरीकडे महावितरण अधिकृत पत्राद्वारे स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरूच राहणार असल्याचे सांगत आहे. त्यामुळे नेमके सत्य काय, याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीजबिले वाढतील का? भविष्यात प्रीपेड पद्धत लागू होणार का? जुने मीटर पूर्णपणे बंद होणार का? ग्राहकांना पर्याय मिळणार का? अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. त्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये चिंता वाढली असून, ग्रामीण भागातही या विषयावर तीव्र चर्चा सुरू आहे.

> “ही लढाई कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून सामान्य वीज ग्राहकांच्या हक्कांसाठी आहे. जनतेच्या मनातील भीती आणि संभ्रम दूर होईपर्यंत आम्ही लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवू.”
>
> – रणधीर कनोजे

दरम्यान, रायगड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांत स्मार्ट मीटरविरोधात नाराजी वाढत असून, अनेक नागरिकांनी शासनाने एकच स्पष्ट आणि अधिकृत भूमिका जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. जनतेला एकीकडे आश्वासने देणे आणि दुसरीकडे स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू ठेवणे, यामुळे शासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## उलवे पोलीस ठाण्यातर्फे सायबर जनजागृती




**| चिरनेर | प्रतिनिधी |**

सगळीकडे सायबर चोरांचे प्रमाण वाढले आहे. बऱ्याच वेळा उच्च शिक्षितही सायबर चोरांच्या जाळ्यात अडकतात. त्यामुळे जनजागृतीची मोहीम उलवे पोलिसांनी हाती घेतली आहे.

त्याचा एक भाग म्हणून उलवे पोलीस ठाण्यातर्फे यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, गव्हाणमध्ये सायबर जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

यावेळी विभागाचे पीएसआय अनिल राजुरे, दीपक करांडे, अशोक साळवे, हवालदार रोहिणी जाधव आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

चुकीच्या लिंक ओपन केल्याने आपल्या मोबाईचा ताबा सायबर चोरटे घेतात. त्यामुळे मोबाईलचा वापर अतियश हुशारीने आणि सावधपणे करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळा आपला फोटा मार्फ केला जातो. त्यामुळे आपले फोटो मोबाईलमध्ये सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांनी अनोळखी माणसाकडून चॉकलेट वा इतर पदार्थ दिल्यास खाऊ नयेत. कारण विद्यार्थ्यांशी चुकीची वागणूक किंवा किडनॅप करण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत सावध राहिले पाहिजे. त्यांनी आपल्या पालकांनाही मोबाईल वापरताना सायबर चोर कसे पैसे चोरतात, हे सांगितले. यावेळी चेअरमन के. डी. कोळी, श्रीकांत घरत, कृष्णा पाटील, मुख्याध्यापक लाड, तसेच शिक्षक वृंद उपस्थित होता.

## माथेरानमध्ये नाव नोंदणीला प्रतिसाद



**| माथेरान | प्रतिनिधी |**

भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात डखठ अंतर्गत मतदार नाव नोंदणीची मोहीम सुरु आहे. माथेरान येथील बाजार पेठ, शिवाजी महाराज नगर, संत गाडगे महाराज विभाग, रेल्वे स्टेशन व पंचवटी नगर या विभागातील मतदारांनी गुरुवारी आयोजित केलेल्या विशेष मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सध्या माथेरान येथे मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे मराठा भवन या समाज हॉल मध्ये मतदार उपस्थित राहिले होते. त्यामुळे शिक्षक विनोद जाधव यांना नाव नोंदणी करण्यास मदत झाली सामाजिक कार्यकर्ते निखिल शिंदे, आदित्य भिलारे यांनी या मोहिमेसाठी विशेष प्रयत्न केले.

## फिरत्या दवाखान्यातून आरोग्य सेवा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात कोतवाल वाडी ट्रस्ट कडून लार्सन अँड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, जे. व्ही. गोखल ट्रस्ट यांच्या मदतीने फिरता दवाखाना चालवला जातो.हा फिरता दवाखाना नेरळ येथील कोतवाल वाडी पासून ३० किलोमीटर अंतरावरील नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील गावात आरोग्य सेवा देणार आहे.



या सेवेची सुरुवात नांदगाव ग्रामपंचायत मधील विविध गावात कोतवाल वाडी ट्रस्टच्या व्यवस्थापकीय संचालक संध्या देवस्थळे यांच्या हस्ते करण्यात आली.

लार्सन अँड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, जे. व्ही. गोखल ट्रस्ट, कोतवालवाडी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने यशोदा आणि यशवंत धावजी फोपे यांच्या स्मरणार्थ नांदगाव ग्रामपंचायतीमधील गावांसाठी आरोग्य सेवा देण्यास सुरुवात झाली. नांदगाव ग्रामपंचायत मधील बळीवरे, भोपळेवाडी, तसेच खांडस ग्रामपंचायत मधील चाफेवाडी भागातील सात आदिवासी वाड्या तसेच ओलमन ग्रामपंचायतीमधील चई, चेवने या भागात दर महिन्याचे शेवटच्या बुधवारी हा फिरता दवाखाना सेवा देणार आहे. नेरळ येथून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या नांदगाव ग्रामपंचायतीमध्ये मोबाईल व्हॅनमधील फिरता दवाखाना पोहचला.

## नागोठण्यात धार्मिक कार्यक्रम

**नागोठणे** : नागोठण्यातील खडकआळी भागातील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास केंद्रात गुरुपौर्णिमा मोठ्या स्वरूपात व उत्साहात साजरी करण्यात आली. येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मठात गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळपासूनच्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या केंद्रातील गुरुपौर्णिमेची सुरुवात सकाळी पाच वाजता पूजा विधीने करण्यात आली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन सुरु करण्यात आले.

## सु.ए.सो.विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी

**पनवेल ग्रामीण** : सु. ए. सो. इंग्रजी माध्यम विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साह, भक्तिभाव आणि संस्कारमय वातावरणात साजरी करण्यात आली. सु. ए. सो. विद्यासंकुल प्रमुख तथा प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरूंच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगणारी भाषणे, गीत आणि सांस्कृतिक सादरीकरणातून गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, आई-वडील हे प्रत्येकाचे प्रथम गुरु असून शाळेतील शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे द्वितीय गुरु आहेत. गुरूंचा आदर, त्यांचे मार्गदर्शन आणि संस्कार यांमुळेच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडते, असे प्रतिपादन केले. प्राचार्य राजेंद्र बाजीराव पालवे यांनीही विद्यार्थ्यांना गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून ज्ञान, शिस्त आणि संस्कार यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**| रसायनी | प्रतिनिधी |**

माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी आमदार मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली वासांबे विभाग प्रमुख मंगेश पाटील यांच्यावतीने वासांबे रसायनी परिसरातील राजिप शाळांतील पंधरा राजिप शाळांतील जवळपास सातशे ते आठशे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी एकनाथ पिंगळे, उमेश गावंड, सुवर्णा मुंडे, रमेश पाटील, भाग्यश्री पवार, दिपिका तांडेल, रोशन राऊत, अर्जुन कदम, सुरेश म्हात्रे, गजानन मांडे, दत्ता खाने, अमित मांडे, रसिका खराडे, प्रतीक्षा राऊत, वेदीका पाटील, करुणा पाटील आदी उपस्थितीत होते.

## आभाकार्ड शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

खांदा वसाहत येथील मुलगंध कुटी विहारमध्ये खास खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच कुटुंबीयांसाठी आबा कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात ज्येष्ठ नागरिकांसह महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. आभाकार्ड नोंदणीसह विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच नागरिकांमध्ये जनजागृती करून त्यांना योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



महिला वर्गासाठी बचत गट, स्वयंसहाय्यता गट तसेच समाजोपयोगी उपक्रमांबाबतही माहिती देण्यात आली. अशा प्रकारचे मोफत शिबिर वेळोवेळी आयोजित करून नागरिकांना लाभ मिळवून देण्याचे कार्य मुलगंध कुटी विहारच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांकडून सातत्याने राबवले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या शिबिरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले असून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

## न्यू होरायझन पब्लिक स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल येथील न्यू होरायझन पब्लिक स्कूलच्या पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरी केली. या निमित्ताने चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.




कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रामाणिक लाकूडतोड्या या कथेवर आधारित प्रभावी नाटिका सादर केली. या नाटिकेतून प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व बालकलाकारांनी उलगडून दाखविले. त्यांच्या निरागस अभिनयाला उपस्थित पालक आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षकांप्रती प्रेम, आदर आणि त्यांच्या मार्गदर्शनाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणारे हृदयस्पर्शी नृत्य सादर केले.




## गुरुपौर्णिमेनिमित्त पुस्तक संचांचे वितरण

**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

गुरुपौर्णिमेच्या पावन निमित्ताने रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा, नवघर येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देणारा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.

परिसरातील यशस्वी उद्योजक, शिक्षणप्रेमी व समाजसेवक सुनील दांडेकर यांनी शिष्यवृत्ती परीक्षा व NMMS स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक पुस्तक संच विद्यार्थ्यांना भेट देत शिक्षणाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपली.

या उपक्रमांतर्गत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी ५, इयत्ता सातवीसाठी ६ आणि इयत्ता आठवीच्या NMMS स्पर्धा परीक्षा तयारीसाठी ५ असे एकूण १६ पुस्तक संच पात्र विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक वितरित करण्यात आले.

याच दिवशी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सवही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या या कार्यक्रमात सुनील दांडेकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी लहान वयापासूनच सुरू करण्याचा संदेश दिला. त्यांच्या या पुस्तक भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी उत्साह, स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास आणि यशाची नवी उमेद निर्माण झाली. पुस्तक संचांचे वितरण राजेंद्र अंबिके व रुपाली लेंडवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका संगीता बैकर, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## कर्जतमध्ये घडले माणुसकीचे दर्शन

**निराधार वयोवृद्धास उपजिल्हा रुग्णालयात दाखल**

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत शहरात माणुसकीचे दर्शन घडले असून सामाजिक बांधिलकी जपत अजय वर्धावे या नागरिकाने वृद्ध व्यक्तीला रस्त्यावरून उचलून रुग्णालयात नेले. तेथे यशस्वी उपचार केल्यानंतर स्वतःच्या पायावर चालण्यास सक्षम बनवले.या कार्याबाबत शहरातील सुजाण नागरिक अजय वर्धावे यांचे कौतुक होत आहे.



कर्जत शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मच्छी मार्केट आहे. त्या मार्केटचे मागील चार ते पाच वर्षांपासून एक निराधार वयोवृद्ध व्यक्ती अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होती. मिळेल त्या ठिकाणी उघड्यावर वास्तव्य करून तसेच दानशूर व्यक्तींनी दिलेल्या अन्नावर उदरनिर्वाह सुरू होता. या वृद्धाची प्रकृती गेल्या काही दिवसांपासून गंभीरपणे खालावली होती. इतकेच नव्हे तर अशक्तपणामुळे त्यांना शौचास जाणेही शक्य होत नव्हते. त्या व्यक्तीला जागेवरच शौच करण्याची वेळ त्यांच्यावर आली होती. ही परिस्थिती पाहून परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत होती.या वृद्धाची दयनीय अवस्था पाहून सामाजिक कार्यकर्ते अजय वर्धावे यांनी तात्काळ त्यांची विचारपूस केली आणि उपचारासाठी दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला.

मात्र, सुरुवातीला संबंधित वृद्धाने दवाखान्यात जाण्यास नकार दिल्याने त्यांच्यासमोर अडचण निर्माण झाली. त्यानंतर अजय वर्धावे यांनी शहरातील विविध व्हॉट्सअप समूहांद्वारे या घटनेची माहिती देत मदतीचे आवाहन केले. ही माहिती मिळताच कर्जत नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक अॅड. रोहित ओसवाल यांनी विविध सामाजिक संस्थांशी संपर्क साधून या निराधार वृद्धाच्या उपचारासाठी सहकार्याची विनंती केली. मात्र, अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी स्वतः पुढाकार घेण्याचा निर्णय घेतला. यानंतर स्वीकृत नगरसेवक अॅड. ओसवाल, महेंद्र चंदन, प्रशांत उर्फ बाबु पाटिल, अजय वर्धावे, प्रशांत शिंदे, केतन गायकवाड यांनी संयुक्तपणे त्या वृद्धाला तातडीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) तमीम युनुस महेश्री, रा. १०७, कुतबी अपार्टमेंट, बी विंग, भाबेळा नाका, वसई वेस्ट, उमेले, ठाणे बॅसीन रोड, महाराष्ट्र ४०१२०२, (२) शोएब साबीर बुबेरे, रा. साळोख तर्फे वरेडी, पो. कळंब, ता. कर्जत, जि.रायगड - ४१०१०१ यांनी खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत तिचे मालक १) सिमीननाज शहाबाज अधिकारी, २) जुलेखाबी खालिद बुबेरे, ३) शगुप्ता नवीद बुबेरे, ४) आसिफ खलिद बुबेरे यांचेकडुन कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा व तुकडी रायगड व पोटतुकडी व तालुका कर्जत, मा. दुय्यम निबंधक, कर्जत - यांचे क्षेत्राधिकारातील मौजे साळोख तर्फे वरेडी, तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

| सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र आर- चौ.मी | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ७८ | ६ | १९-०० | १९०-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहान, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वैगेरे हक्क असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २९/०७/२०२६

**(रोहिदास जनार्दन मिणमिणे)**
**अधिवक्ता**
रा.भडवळ, पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९६८९९९२४१९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) अख्तर अली अब्दुल्ला खान रा.कनवजेवाडी लांजा, रत्नागिरी महाराष्ट्र -४१६७०१, २) शोएब साबीर बुबेरे, रा. साळोख तर्फे वरेडी, पो. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१ यांनी खालील वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत तिचे मालक १) सलिम नाझीर खान, २) चाहत सुलतान आयुब खान, ३) ताहीर अहमद शेख यांचेकडुन कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा व तुकडी रायगड व पोटतुकडी व तालुका कर्जत, मा.दुय्यम निबंधक, कर्जत-यांचे क्षेत्राधिकारातील मौजे कळंब, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

| सर्वे नंबर | हिस्सा नंबर/प्लॉट नं. | क्षेत्र आर- चौ.मी | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| १८६ | ४/ड | ५-५० | ५५-०० |
| १८६ | ४/क | ५-५० | ५५-०० |
| १८६ | ४/ई | १०-०० | १०-०० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहान, दाण, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वैगेरे हक्क असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २९/०७/२०२६

**(रोहिदास जनार्दन मिणमिणे)**
अधिवक्ता
रा.भडवळ, पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९६८९९९२४१९

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे मालेगाव तर्फे कोथलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ. मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| पाल्म पॅराडाईज रिअलेटर्स एल.एल.पी तर्फे भागीदार श्री.विश्वास श्रीधर माने. श्री.समद हमीद मकानी | ५८/१४ | ३१५-०० | ३१-५० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ३०/०७/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## ग्रुप ग्रामपंचायत बेलवडे
## जाहीर निविदा

तमाम जनतेस कळविणेत येते की, ग्रुप ग्रामपंचायत बेलवडे येथील ग्रामपंचायत बेलवडे १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ अंतर्गत खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून करून घेणेसाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं हद्दीतील बोअरवेल दुरुस्त करणे. | ८०,०००/- | २०२५-२६ |
| २ | ग्रा.पं. हद्दीतील विहिरींना जाळ्या बसविणे | २,४३,५००/- | २०२५-२६ |
| ३ | ताडाचीवाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | १,५०,०००/- | २०२५-२६ |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालयाचे शौचालय दुरुस्ती करणे | ४५,७००/- | २०२५-२६ |
| ५ | बेलवडे बु.,बेलवडे खु. व मुंगोशी स्मशानभूमीवर पाण्याची टाकी आणि चौथरा बांधणे | १,५०,०००/- | २०२५-२६ |

**अटी व शर्ती : -**

१) सदरची कामे मा. उप अभियंता (बां.) रा.जि.प. उपविभाग पेण यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे.
२) कामाच्या मुल्यांकन रक्कमेतून अधिकृत करांची कपात करणेत येईल.
३) सर्व कामे अंदाजपत्रकाप्रमाणे करणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
४) कामे पूर्ण झाल्यावर बिलाप्रमाणे/मुल्यांकनाशिवाय देयके अदा केली जाणार नाहीत.
५) सर्व निविदा स्वीकारणेचा व नाकारणेचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
६) कोणतीही निविदा स्वीकारल्या नंतर नाकारलेली निविदा कळवण्याची जबाबदारी नाही.

निविदा स्वीकारणेचा अंतिम दिनांक :- ०६/०८/२०२६ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत.
निविदा उघडणेचा दिनांक :- ०७/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता.

ग्रामसेवक
**ग्रुप ग्रामपंचायत बेलवडे**
ता. पेण. जि. रायगड

सरपंच
**ग्रुप ग्रामपंचायत, बेलवडे**
ता.पेण, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेली आहे.

**मौजे इंजिवली, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गणु खंडू मोडक | ४ | १/क | एकुण क्षेत्र ०-५२-०० त्यापैकी लिहून दिलेले क्षेत्र ०-३०-०० हे.आर.पॉ | ४-१२ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ३०/०७/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.स्वप्निल बाबूराव देशमुख**
पत्ता. सदनिका नं. ५०४, ५ वा मजला, गजवक्र रेसिडेंन्सी, कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८८३०५६०९६२/९२७३२२४६८०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत (सदर मिळकत) संतोष केसरीनाथ राऊत, नीला संदेश राऊत, भक्ती चारुदत्त चोगले, मयुरेश सुबोध काठे, संध्या अशोक म्हात्रे, विद्या सुरेश पाठारे, विश्वजित विनायक काठे, संदेश केसरीनाथ राऊत, शुभांगी नितीन म्हात्रे, कला सुभाष चोडणकर, ज्योती विलास पाठारे, सुमन सूर्यकांत राऊत, पुष्पलता कृष्णकांत काठे, अमित कृष्णकांत काठे, मीनल कृष्णकांत काठे, मंगेश रुस्तम नाईक, मंजुषा रमेश बांदे, अनुराधा शांताराम काठे, निवेदिता शांताराम काठे, आणि यशोदिता शांताराम काठे, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याचा भरवंसा देऊन, सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायम खुषखरेदी देण्याबाबत त्यांची आमचे अशिलांसोबत बोलणी चालू आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत आमची कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा नाही व असल्यास, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे,

**परिशिष्ट :-** तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका अलिबाग व मे. दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे स्थलसीमेतील तसेच जिल्हा परिषद अलिबाग-रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग हद्दीतील गाव मौजे कामथ येथील गट नंबर २६४, यांसी क्षेत्र ०० हेक्टर ४५.०८ आर, अधिक पोटखराबा ०० हेक्टर १.४२ आर, यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर ४६.५० आर यांसी आकार रुपये ९=७९ पैसे, यांसी चतुःसीमाः पूर्वेस गट नं. २७३, २६०, २६१, २६२, २६३, २८९, दक्षिणेस गट नं. २८२, २६२, २६३, २६५ व २६८, पश्चिमेस गट नं. २७६, २६९, २६८, २६७, २६३ व २६५ आणि उत्तरेस गट नं. २७५, २७३ येणेप्रमाणे मिळकत, त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, जल, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेप वगैरे सर्व तदंगभूत वस्तूंसहीत व जाण्यायेण्याच्या, रस्त्याच्या, वहिवाटीच्या तसेच सर्व तद्अनुषंगिक व संलग्नित हक्कांसह दरोबस्त, काही एक राखून न ठेवता,

दि.: २९.०७.२०२६

सही/-
**नवनीत मुथा, ॲडव्होकेट**
८. जय अपार्टमेंट्स, १०९८/१४,
मॉडेल कॉलनी, पोस्टऑफीस जवळ,
शिवाजीनगर, पुणे -४११०१६.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत (सदर मिळकत) **राजेश मनोहर काठे, सिल्केशा शशांक कीर, तारामती मुकुंद म्हात्रे, हेमलता हेमंत ठाकुर, अनिता अनंत नाईक, राजश्री हेमंत रकवी आणि आरती रामनाथ देसाई** यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याचा भरवंसा देऊन, सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत आमची कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार अगर बोजा नाही व असल्यास, त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे,

**परिशिष्ट:-** तुकडी रायगड, पोट तुकडी तालुका अलिबाग व मे.दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे स्थलसीमेतील तसेच जिल्हा परिषद अलिबाग-रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग हद्दीतील गाव मौजे कामथ येथील गट नंबर २८२, यांसी क्षेत्र ०० हेक्टर ४४.६० आर अधिक पोटखराबा ०० हेक्टर ३.८० आर यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर ४८.४० आर यांसी आकार रुपये ११=०१ पैसे, यांसी चतुःसीमा: पूर्वेस गट नं. २८९, दक्षिणेस गट नं.२८३ व २८४, पश्चिमेस गट नं.२६७ आणि उत्तरेस गट नं.२६७, २६५ व २६४; येणेप्रमाणे मिळकत, त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, जल, तृण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप वगैरे सर्व तदंगभूत वस्तूंसहीत व जाण्यायेण्याच्या, रस्त्याच्या वहिवाटीच्या तसेच सर्व तद् अनुषंगिक व संलग्नित हक्कांसह दरोबस्त, काही एक राखून न ठेवता,

दि.: २९.०७.२०२६

सही/-
**नवनीत मुथा, ॲडव्होकेट**
८, जय अपार्टमेंट्स, १०९८/१४,
मॉडेल कॉलनी, पोस्टऑफीस जवळ,
शिवाजीनगर, पुणे -४११ ०१६.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- देवघर, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील पुढील वर्णनाची मिळकत आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १ गिरीश जगन्नाथ पाटील २ अंजली गिरीश पाटील यांचेकडुन आमचे आशिलांनी जमिन मिळकत खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्याबाबत आमचे आशिलांनी त्यांच्याबरोबर साठेकरार केला आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे. देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड | ४०३ | क्षेत्र ०-२०-१० | ०.०० |

तरी वरील जमिन मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३०/०७/२०२६

सही
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्या वर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग - रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे शिंगढोळ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| प्रसाद अशोक भोपतराव, गणेश विठ्ठल क्षिरसागर, मनोज भाईचंद ओसवाल | ४८ | एकुण क्षेत्र ०-१८-०० हे आर पॉ | ०-९४ |
| प्रसाद अशोक भोपतराव, अविनाश विठ्ठल क्षिरसागर, मेकांश दिलीप परमार | ४७/२ | एकुण क्षेत्र ३-९२-०० हे आर पॉ | १-३८ |
| शंकर नामदेव फाळे व इतर ८ यांचे कु. मु. म्ह. प्रसाद अशोक भोपतराव व इतर २ | ५० | एकुण क्षेत्र ०-२५-३० हे आर पॉ | ०-०९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुद-तीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ३०/०७/२०२६

**वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत
जिल्हा रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत तिचे मालक १) सुनिल दादा कदम व २) श्री. विठ्ठल मोहन कदम यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर. | एकूण क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|
| २१/४ | १ ते २७ | ७९१० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०/०७/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफिस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११( डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा जिल्हा परिषद चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ३१/०५/२०२१ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक १०.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री नितीन शंकर तुणतुणे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १२.०६.२०१७ पर्यंतची रक्कम रुपये ४,२८,४१९/- व दिनांक ०१.०४.२०१७ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे मापगाव ता. अलिबाग हद्दीतील श्री. संदेश तुकाराम थळे यांच्या नावे असलेली भुमापन क्रमांक व उपविभाग १७७/१/१ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक १२.०६.२०१७ पर्यंतची रक्कम रुपये ४,२८,४१९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री नितीन शंकर तुणतुणे**
श्री. संदेश तुकाराम थळे यांच्या नावे असलेली भूमापन क्रमांक व उपविभाग १७७/१/१ क्षेत्र १.९१.५० हे आर ही जमीन

स्थळ : अलिबाग
दिनांक : २९.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस

दि. ३०/०७/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली बिनशेती तसेच त्यावरील घर मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर बिनशेती तसेच घर मिळकतीच्या विक्री संबंधित बोलणी विद्यमान मालक १) आर्या अमोल चिपळूणकर २) प्रभाकर सदाशिव जोशी ३) मोहिनी प्रभाकर जोशी यांचेसोबत झालेली आहे. सदर बिनशेती तसेच घर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर बिनशेती तसेच घर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या बिनशेतीचे तसेच त्यावरील घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग/मालमत्ता क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार/मालमत्तेचे तपशिल |
|---|---|---|---|
| गोंधळपाडा ता. अलिबाग | २०/५ | एकूण क्षेत्र २-८५-०० | २८.५० |
| ग्रामपंचायत वेश्वी | ७८५ | ८०० चौ. फूट | आर.सी.सी. घर |

वर वर्णन केलेली बिनशेती मिळकत तसेच त्यावरील घर ही या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील बिनशेती मिळकत तसेच त्यावरील घरा संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील बिनशेती तसेच घर मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मूळ सही शिक्क्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची बिनशेती तसेच घर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती तसेच घर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अपर्णा गोपिनाथ भगत**
मु. पोयनाड पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा नं. ९३७१७५२२२७

## जाहीर नोटीस

माझे आशील श्री. सोहम मुकेश पटेल, रा. फाईन हाउस, पाचवा मजला, आनंदजी लेन, भावेश्वर मार्केट जवळ, एम.जी.रोड, घाटकोपर (पुर्व), मुंबई ७० यांनी दिलेल्या माहिती व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

मौजे धोकवडे, ता. अलिबाग गट नं. ७७६/२ क्षेत्र ०.२७.० हे. आर., आकार रू. ७.०० पैसे हि मिळकत माझे आशिल यांनी दिनांक ०८.०१.२०२४ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखता अन्वये खरेदी केली असुन माझे आशिल यांचे कब्जे वहीवाटीत आहे. सदरहु मिळकती बाबत माझे आशील, पिपल एज्युकेशनल सोसायटी व इतर यांचे दरम्यान वाद प्रलंबित असुन मा. अपर जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी आर.टी.एस. अपिल क्र. ६४/२०२५ चे कामी दिनांक २०.०२.२०२६ रोजी दिलेल्या निर्णयास आव्हान देवुन माझे आशिल यांनी पिपल एज्युकेशनल सोसायटी, वगैरे ५० सर्व मु.धोकवडे, ता. अलिबाग, जि.रायगड यांचे विरूद्ध मा. अपर आयुक्त कोकण विभाग, मुंबई यांजकडे रिव्हीजन अर्ज क्र. ५८४/२०२६ चे प्रकरण दाखल केले आहे. सध्या सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. मौजे धोकवडे गट नं. ७७६/२ हि मिळकत माझे आशिल यांचे मालकी हक्काची असुन सदरहु मौजे धोकवडे गट नं. ७७६/२ या मिळकतीशी पिपल एज्युकेशनल सोसायटी, रा. रावसाहेब पी.एन.पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई ४०००२८ यांचा कोणताही हक्क हितसंबंध पोहचत नव्हता व नाही.

मात्र, मौजे धोकवडे गट नं. ७७६/२ या मिळकती बाबत मा. अपर जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी आर. टी. एस. अपिल क्र. ६४/२०२५ चे कामी दिलेल्या दिनांक २०.०२.२०२६ रोजीचे निर्णयास अनुसरून पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन. पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई ४०००२८ हे सदरहु मिळकतीस त्यांचे नाव नोंदले आहे, याचा गैरफायदा घेवुन माझे आशील यांचा हक्क डावलून सदर मिळकत त्रयस्त व्यक्तींचे लाभात हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत, अशी खात्रीशीर माहीती माझे आशिल यांस मिळाली आहे.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की, पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन.पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई २८ वा सदर संस्थेचे अधिकारी यांचेशी संदर्भात मौजे धोकवडे गट नं. ७७६/२, क्षेत्र ०.२७.० हे. आर., आकार रू. ७.०० पैसे या मिळकती बाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. या उपरही कोणीही बेकायदेशीरपणे व्यवहार केल्यास वा ठरविल्यास तो व्यवहार माझे आशील यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. या संदर्भात माझे आशिल हे पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री.सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन.पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई २८ यांचे विरूध्द अलिबाग दिवाणी न्यायालयात स्वतंत्र कायदेशीर कारवाई करणार आहेत. कळावे.

अलिबाग
तारीख २९.०७.२०२६

**ॲड. एस. वाय. बारटके**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रेवदंडा चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०५/०६/२०२६ रोजी निर्गमित केली व त्या नंतर दिनांक २०.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री पांडरुंग धोंडू दिवकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक २८.०२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ४,६९,३१८/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १०.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रुप ग्रामपंचायत रामराज ता. अलिबाग मधील श्री. पांडुरंग धोंडू दिवकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र. ४२२ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक २८.०२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ४,६९,३१८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री पांडुरंग धोंडू दिवकर**
मौजे ग्रुप ग्रामपंचायत रामराज ता.अलिबागमधील श्री. पांडुरंग धोंडू दिवकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र. ४२२ क्षेत्र ९६० चौ फु हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २९.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| चौल, ता. अलिबाग | १५६७ | ०-४०-७० जिरायत<br>०-१६-७० बागायत<br>०-०६-८० पो.ख.<br>०-६४-२० एकुण | १०.३७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-३२-१० हे. आर., आकार ५ रू १९ पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक २९/०७/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
रा. थेरोंडा, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९०२८८५१२८०

## जाहीर नोटीस

माझे आशील श्री.विक्रम शरद शेठ, रा. के. ई. एस. कन्या शाळेजवळ, अलिबाग, पो.ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

मौजे धोकवडे, ता. अलिबाग गट नं. ७७६/१ क्षेत्र १.५५.८ हे. आर., आकार रू. ३३.१७ पैसे हि मिळकत माझे आशिल यांनी दिनांक २०.०२. २०१९ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखता अन्वये खरेदी केली असुन माझे आशिल यांचे कब्जे वहीवाटीत आहे. सदरहु मिळकती बाबत माझे आशील, पिपल एज्युकेशनल सोसायटी व इतर यांचे दरम्यान वाद प्रलंबित असुन मा. अपर जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी आर.टी.एस. अपिल क्र. ६५/२०२५ चे कामी दिनांक २०.०२.२०२६ रोजी दिलेल्या निर्णयास आव्हान देवुन माझे आशिल यांनी पिपल एज्युकेशनल सोसायटी, वगैरे ५० सर्व मु.धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे विरूद्ध मा. अपर आयुक्त कोकण विभाग, मुंबई यांजकडे रिव्हीजन अर्ज क्र. ५८३/२०२६ चे प्रकरण दाखल केले आहे. सध्या सदरचे प्रकरण प्रलंबित आहे.

तसेच मौजे धोकवडे गट नं. ७७६/१ या मिळकती बाबत श्री. गोविंद सखाराम पाटील यांनी माझे आशिल पिपल एज्युकेशनल सोसायटी व इतर यांचे विरूद्ध स्पेशल मुकदमा क्र. १९१/२०२२ हा दावा मा. दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे दाखल केला आहे. याशिवाय मौजे धोकवडे गट नं. ७७६/१ या मिळकती बाबत श्री. विक्रम मधुकर पेठे यांनी माझे आशिल व इतर यांचे विरूद्ध मा. दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे स्पेशल मुकदमा क्र. ३६/२०१९ हा दावा दाखल केला आहे. सदरची प्रकरणे प्रलंबित आहेत. धोकवडे गट नं. ७७६/१ हि मिळकत माझे आशिल यांचे मालकी हक्काची असुन सदरहु मौजे धोकवडे गट नं. ७७६/१ या मिळकतीशी पिपल एज्युकेशनल सोसायटी यांचा कोणताही हक्क हितसंबंध पोहचत नव्हता व नाही.

मात्र, मौजे धोकवडे गट नं. ७७६/१ या मिळकती बाबत मा. अपर जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी आर.टी.एस. अपिल क्र. ६५/२०२५ चे कामी दिलेल्या दिनांक २०.०२.२०२६ रोजीचे निर्णयास अनुसरून पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन. पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई ४०००२८ हे सदरहु मिळकतीस त्यांचे नाव नोंदले आहे, याचा गैरफायदा घेवुन माझे आशील यांचा हक्क डावलून सदर मिळकत त्रयस्त व्यक्तींचे लाभात हस्तांतरीत करण्याचे प्रयत्नात आहेत, अशी खात्रीशीर माहिती माझे आशिल यांस मिळाली आहे.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की, पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन.पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई-४०००२८ वा सदर संस्थेचे अधिकारी यांचेशी संदर्भात मौजे धोकवडे गट नं. ७७६/१, क्षेत्र १.५५.८ हे. आर., आकार रू. ३३.१७ पैसे या मिळकती बाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. या उपरही कोणीही बेकायदेशीरपणे व्यवहार केल्यास वा ठरविल्यास तो व्यवहार माझे आशील यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. या संदर्भात माझे आशिल हे पिपल एज्युकेशनल सोसायटी तर्फे सेक्रेटरी श्री. सुनिल आनंद शिंदे, रा. रावसाहेब पी.एन.पी. काळे मार्ग, गोखले रोड दक्षिण, दादर, मुंबई २८ यांचे विरूद्ध अलिबाग दिवाणी न्यायालयात स्वतंत्र कायदेशीर कारवाई करणार आहेत. कळावे.

अलिबाग
तारीख २९.०७.२०२६

**ॲड. एस.वाय. बारटके**
मु. पो. ता.अलिबाग, जि. रायगड

# गिल बनला वनडेचा नंबर १ फलंदाज




■ रोहित-विराट देखील टॉप-५ मध्ये झळकले

■ शुभमन गिलची एकदिवसीय कारकीर्द

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुभमन गिलने आयसीसी रँकिंगमध्ये मोठी झेप घेतली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २९ जुलै रोजी नवीन क्रमवारी जाहीर केली. यानुसार शुभमन गिलने आयसीसी एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थान पटकावले आहे. गिलने न्यूझीलंडच्या डॅरिल मिशेलला मागे टाकले आहे. यापूर्वी गिल दुसऱ्या क्रमांकावर होता. एकदिवसीय क्रमवारीत विराट कोहली आणि रोहित शर्मा यांचाही अव्वल पाचमध्ये समावेश आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या एकदिवसीय फलंदाजी क्रमवारीत डॅरिल मिचेलच्या अनुपस्थितीचा फायदा गिलला झाला आहे. वेस्ट इंडिज दौऱ्यावर खेळल्या गेलेल्या ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दोन सामन्यांमध्ये मिचेल खेळला नाही, ज्यात तो पूर्वी ८०२ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर होता, तर आता तो ७९४ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. याचा थेट फायदा शुभमन गिलला झाला असून तो आता ८०१ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर पोहोचला आहे. क्रमवारीतील अव्वल पाच फलंदाजांमध्ये, विराट कोहली तिसऱ्या आणि रोहित शर्मा चौथ्या स्थानावर आहे. कोहली ७६७ रेटिंग गुणांवर आहे, तर रोहित शर्मा ७५८ रेटिंग गुणांवर आहे. इब्राहिम झद्रान ७१२ रेटिंगसह पाचव्या स्थानावर आहे.

### शुभमन गिलची एकदिवसीय कारकीर्द

गिलने आतापर्यंत या फॉरमॅटमध्ये ६७ सामने खेळले आहेत. ६६ डावांमध्ये फलंदाजी करताना त्याने ३३७९ धावा केल्या आहेत. या काळात त्याने ९ शतके आणि २० अर्धशतके झळकावली असून, त्याची सर्वोच्च धावसंख्या २०८ आहे.

### गिलची अप्रतिम कामगिरी

जून महिन्यात भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळली, ज्यात गिलची बॅट चांगली तळपली होती. त्याने दोन डावांमध्ये २३८ धावा केल्या. त्याने पहिल्या सामन्यात नाबाद ८४ आणि दुसऱ्या सामन्यात १५४ धावा केल्या. त्याने या मालिकेत सर्वाधिक धावा केल्या त्यानंतर गिलने इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने तीन डावांमध्ये १८८ धावा केल्या आणि तो दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. या तीन सामन्यांमध्ये गिलने अनुक्रमे ८०*, ३१ आणि ७७ धावा केल्या. भारतीय संघाची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पुढील मालिका आता श्रीलंकेविरुद्ध आहे. १५ ऑगस्टपासून कसोटी मालिकेला सुरुनात होणार आहे.

## कर्जत तालुक्यात होणार पावसाळी क्रीडा महोत्सव

### शिक्षण विभागाकडून मैदानी खेळांचे नियोजन



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात शिक्षण विभागाच्या वतीने ऑगस्ट महिन्यात पावसाळी क्रीडा स्पर्धा होणार आहेत.याबाबत नियोजन करण्यात आले असून सर्व मैदानी खेळ या क्रीडा स्पर्धेत असणार आहेत.जिल्हा परिषद शाळा आणि माध्यमिक शाळांनी पावसाळी क्रीडा स्पर्धेत सहभाग घ्यावा असे आवाहन केले आहे.

क्रीडा व युवा संचलनालय महाराष्ट्र शासन आयोजित कर्जत तालुकास्तर शासकीय शालेय क्रीडा स्पर्धांचे नियोजन केले जाणार आहे. रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या पत्रानुसार पंचायत समिती कर्जत शिक्षण विभाग कडून पावसाळी क्रीडा महोत्सव आयोजित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पावसाळी क्रीडा महोत्सव मध्ये विविध मैदानी स्पर्धा यांचा सहभाग असणार आहे.या स्पर्धा जिल्हा परिषद शाळा आणि तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळा येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत.जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या सूचनेनुसार तालुका क्रीडा विभागाची बैठक तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील यांनी घेतली. तालुका गटशिक्षण अधिकारी यांच्या मान्यतेने तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील यांनी क्रीडा विभागाची बैठक घेऊन नियोजन केले.तालुक्यातील अधिकाधिक खेळाडूंनी आपले क्रीडा कौशल्य दाखवून कर्जत तालुक्याचे नाव उज्वल करावे आणि तालुका स्तरावरून जिल्हास्तरापर्यंत सुरू राहणार प्रवास अशा स्पर्धांमध्ये सुद्धा सहभाग नोंदवून लाभ घ्यावा असे आवाहन रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

पावसाळी क्रीडा स्पर्धा १४ वर्षाखालील,१७वर्षेखालील आणि १९ वर्षे खालील मुला-मुलींसाठी खेळविली जाणार आहे. एकूण दहा खेळांमध्ये तालुकास्तरावर आपले क्रीडाप्राविण्य दाखवून जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारण्याची संधी मिळणार आहे. १४, १७ व १९ वर्ष आतील तालुक्यातील शासनमान्य सर्व माध्यमाच्या सर्व प्रकारच्या शाळांमधील सहावी ते बारावी मध्ये शिकणाऱ्या मुला मुलींसाठी कॅरम, बुद्धिबळ, योगासने, बॅडमिंटन, कुस्ती, हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो तसेच मैदानी स्पर्धा, धावण्याचे सर्व प्रकार, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळीफेक, भालाफेक, हातोडा फेक, चालणे, हर्डल्स आणि कराटे स्पर्धा घेतल्या जाणार आहेत.

## निवडक

### आयएसएसएफ विश्वचषकात भारताला चौथे पदक

**नवी दिल्ली :** चीनमधील हांगझोऊ येथे सुरू असलेल्या इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट्स फेडरेशन वर्ल्ड कपमध्ये सोनम मस्कर आणि हिमांशू ढिल्लोंच्या जोडीने १० मीटर एअर रायफल मिक्स्ड टीम इव्हेंटमध्ये कांस्यपदक जिंकले. दोघांनी मेडल राऊंडमध्ये २२०.६-२२०.६ गुण मिळवत एकूण ४४१.२ गुण मिळवले आणि तिसऱ्या स्थानावर राहिले. यासोबतच स्पर्धेत भारताच्या पदकांची संख्या चार झाली आहे. यापूर्वी ईशा सिंगने सुवर्ण, सैन्यमने रौप्य आणि मनू भाकरने कांस्यपदक जिंकले होते. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत भारताच्या ईशा सिंगने सुवर्णपदक जिंकले, तर मनू भाकरने कांस्यपदक पटकावले. ईशा सिंगच्या सुवर्ण आणि मनू भाकरच्या कांस्यपदकासह सध्याच्या स्पर्धेत भारताने एकूण तीन पदके मिळवली आहेत. यापूर्वी भारतीय नेमबाज सैन्यमने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल स्पर्धेत रौप्यपदक जिंकून भारताचे खाते उघडले होते.या स्पर्धेत यजमान चीनचे वर्चस्व राहिले. जिफेई वांग आणि लिहाओ शेंगच्या जोडीने ५०५ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. तर, चीनच्या दुसऱ्या संघाने ५०४.६ गुण मिळवून रौप्यपदक पटकावले.भारताची दुसरी जोडी इलावेनिल वालारिवन आणि पार्थ माने पदक जिंकण्यापासून वंचित राहिली. दोघांनी अंतिम फेरीत ३७८.८ गुण मिळवले आणि चौथ्या स्थानावर राहिले. पात्रता फेरीत सोनमने ३१७.२ आणि हिमांशूने ३१७.४ गुण मिळवले. दोघांचा एकूण पात्रता गुण ६३४.६ राहिला.तर इलावेनिलने ३१६.८ आणि पार्थने ३१७.४ गुण मिळवले, ज्यामुळे त्यांच्या संघाचा एकूण पात्रता गुण ६३४.२ राहिला.कांस्यपदक जिंकल्यानंतर सोनम मस्कर म्हणाली, ही खूपच चुरशीची स्पर्धा होती, पण आम्ही दबावाला आमच्यावर हावी होऊ दिले नाही.

### राष्ट्रीय मास्टर पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंचे यश




**नवीन पनवेल** : : १८ ते २३ जुलै दरम्यान औरंगाबाद येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे रामचंद्र सखाराम गावडे यांनी ८३ किलो वजनी गटात मास्टर-३(६० वर्षावरील)स्पर्धेत स्कॉटमध्ये कास्य पदक, बेंचप्रेस मध्ये कांस्य पदक, डेडलिफ्टमध्ये रौप्य पदक आणि संपूर्ण स्पर्धेत कांस्य पदक असे एकूण ४ पदकं मिळाली. रामचंद्र सखाराम गावडे हे पूर्वी मुंबई जिल्ह्यातून आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळलेले आहेत. गेली काही वर्षापासून त्यांनी पनवेलमध्ये निवासस्थान घेतले आहे. तसेच मास्टर २ (पन्नास वर्षावर) स्पर्धेत ६६ किलो वजनी गटात महेश कृष्णा पाटील (वावोशी-खोपोली)यांनी सुद्धा स्कॉट आणि डेडलिफ्ट या प्रकारात कांस्य पदक मिळवले. तसेच मास्टर-४(७० वर्षावरील) स्पर्धेत ज्येष्ठ खेळाडू रमेश खरे (पेण, हनुमान व्या. शाळा ) यांनी बेंचप्रेस प्रकारात कांस्यपदक मिळविले. या सर्व मास्टर खेळाडूने केलेल्या कामगिरीबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर आणि सर्व पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## क्रिकेटर यश दयालला न्यायालयाचा दिलासा



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

अलाहाबाद उच्च न्यायालयाने बुधवारी क्रिकेटपटू यश दयाल यांच्या विरोधात कनिष्ठ न्यायालयात सुरू असलेल्या कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. यश दयाल यांच्यावर एका महिलेने लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याचा आरोप केला आहे.

न्यायालयाने गाझियाबादच्या दंडाधिकारी न्यायालयाने जारी केलेले समन्स आणि ट्रायल कोर्टाच्या संपूर्ण कार्यवाहीला स्थगिती दिली. न्यायमूर्ती संजय कुमार पचोरी यांच्या एकल खंडपीठाने यश दयाल यांच्या त्या याचिकेवर हा आदेश दिला, ज्यात त्यांनी पोलिसांच्या आरोपपत्राला आणि ट्रायल कोर्टाच्या दखल घेण्याच्या आदेशाला आव्हान दिले होते.

गाझियाबाद पोलिसांनी जुलै २०२५ मध्ये एका महिलेच्या तक्रारीवरून यश दयाल यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. महिलेचा आरोप आहे की, पाच वर्षांच्या संबंधादरम्यान क्रिकेटपटूने लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले होते.

यापूर्वी १५ जुलै २०२५ रोजी उच्च न्यायालयाने एफआयआर रद्द करण्याच्या याचिकेवर दयाल यांच्या अटकेला स्थगिती दिली होती. आता आरोपपत्र दाखल झाल्यानंतर त्यांनी ट्रायल कोर्टाची कार्यवाही रद्द करण्यासाठी स्वतंत्र याचिका दाखल केली आहे.

याचिकेत यश दयालने दावा केला आहे की, त्यांचे नाते सुरुवातीपासूनच परस्पर संमतीवर आधारित होते आणि त्यात लग्नाचे कोणतेही वचन नव्हते.

दयालचा युक्तिवाद आहे की, हे प्रकरण जास्तीत जास्त लग्नाच्या वचनातून फिरण्याचे असू शकते, खोट्या लग्नाच्या वचनाचे नाही. त्यांनी सांगितले की, तक्रारदाराने स्वतः कबूल केले आहे की, शारीरिक संबंध २०२१ मध्ये प्रस्थापित झाले होते, तर लग्नाची चर्चा नंतर झाली.

## फुटबॉल मैदानावर दिसणार 'टायगर'चा जलवा



। मुंबई । प्रतिनिधी ।

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ आता फुटबॉल मैदानावरही खेळताना दिसेल. १३५ व्या ड्युरंड कप फुटबॉलसाठी मुंबई एफसीने ३६ वर्षीय अभिनेत्याचा आपल्या संघात समावेश केला.

मुंबई एफसीचे तांत्रिक संचालक झोहेब खान यांनी सांगितले की, ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांचा मुलगा असलेला टायगर श्रॉफ सध्या संघासोबत नियमित सराव करत असून त्याच्या फुटबॉल खेळण्याच्या क्षमतेने क्लबला खूप प्रभावित केले आहे. ते म्हणाले की, टायगरला खेळाची चांगली तांत्रिक समज आहे. त्याला स्लाइड टॅकल, वन-ऑन-वन ड्रिबलिंग तसेच आक्रमक खेळण्याच्या शैलीत विशेष रस आहे. ड्युरंड कपमध्ये मुंबई एफसी ३ ऑगस्ट रोजी शिलाँग येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर लांगस्निंग एफसीविरुद्ध सलामीला खेळेल.

## गुलवीर सिंहची ऐतिहासिक दौड

**नवी दिल्ली :** धावपटू गुलवीर सिंगने राष्ट्राकुल क्रीडा स्पर्धेत इतिहास रचला आहे. ग्लासगो येथील स्कॉटस्टौन स्टेडियमवर पार पडलेल्या पुरुषांच्या १०,००० मीटर शर्यतीत रौप्य पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय पुरुष धावपटू ठरला आहे. राष्ट्रीय विक्रमवीर असलेल्या गुलवीरने २७:४९.८ अशी उत्कृष्ट वेळ नोंदवत हे पदक आपल्या नावावर केले. या शर्यतीत ऑस्ट्रेलियाच्या काय रॉबिन्सनने २७:४८.९३ सेकंदाच्या वेळेसह सुवर्णपदक पटकावले, तर डेव्हिड म्युलार्कीने कांस्यपदक मिळवले.

## शुभदीप घोष भारतीय संघाचे नवीन फिल्डिंग कोच



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आसामचे माजी देशांतर्गत क्रिकेटपटू शुभदीप घोष यांची बीसीसीआयने टीम इंडियाचे नवीन क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. ते टी. दिलीप यांची जागा घेतील. इंग्लंडच्या व्हाईट-बॉल दौऱ्यानंतर टी. दिलीप यांचा कार्यकाळ संपला होता आणि बीसीसीआयने तो पुढे वाढवला नाही. शुभदीप यांचे पहिले कार्य ऑगस्टमध्ये श्रीलंका दौरा असेल, जिथे भारत दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळेल. मात्र, बीसीसीआयने अद्याप याची अधिकृत घोषणा केलेली नाही.

१९६८ मध्ये आसाममधील डिगबोई येथे जन्मलेले शुभदीप घोष उजव्या हाताचे मधल्या फळीतील फलंदाज आणि ऑफ-स्पिनर होते. त्यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये आसाम आणि रेल्वेचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी १७ प्रथम श्रेणी आणि १७ लिस्ट-ए सामने खेळले. प्रथम श्रेणीत ३१६ आणि लिस्ट-ए मध्ये ३०७ धावा केल्या. त्यांनी १९९४-९५ च्या हंगामात देशांतर्गत क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. २००४ मध्ये शेवटचा प्रथम श्रेणी आणि २००५ मध्ये शेवटचा लिस्ट-ए सामना खेळला.

संन्यास घेतल्यानंतर शुभदीपने प्रशिक्षणाची सुरुवात केली आणि गेल्या सहा-सात वर्षांपासून तो नॅशनल क्रिकेट अकादमीशी संबंधित आहे. राहुल द्रविड प्रमुख असतानाही त्याने खेळाडूंसोबत काम केले. या काळात त्याने वेगवेगळ्या वयोगटातील भारतीय संघांसोबत क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून भूमिका बजावली. शुभदीप घोष ऑगस्टमध्ये होणाऱ्या भारत-श्रीलंका दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतून भारतीय संघासोबत जोडले जातील.

## वेस्ट इंडिजकडून पाकचा ९० धावांनी पराभव



■ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉईंट्स टेबलमध्ये उलथापालथ

■ बाबर आझम कर्णधार म्हणून पुन्हा अपयशी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सध्या वेस्ट इंडिज आणि पाकिस्तान यांच्यात दोन कसोटी सामन्यांची सिरिज खेळवली जात आहे. यातील पहिला सामना पार पडला आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजच्या संघाने पाकिस्तानवर ९० रन्सने विजय मिळवला आहे. या सिरिजमध्ये वेस्ट इंडिजने १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन्सशिपच्या पॉईंट्स टेबलमध्ये उलथापालथ झाली आहे.

पाकिस्तानचा पराभव झाल्याने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये मोठ्या हालचाली झाल्या आहेत. पाकिस्तानची स्थिती वाईट झाली आहे. पाकिस्तानने बाहेरील देशांमध्ये कसोटी खेळताना सलग ८ वा सामना गमावला आहे. तसेच पाकिस्तानचा संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉईंट्स टेबलमध्ये शेवटच्या स्थानावर आहे. त्यामुळे पुढील सामना मोठ्या फरकाने जिंकण्याचे आव्हान पाकिस्तानसममोर असणार आहे.

या सीझनमध्ये पाकिस्तानने ५ कसोटी सामने खेळले आहेत. मात्र त्यापैकी ४ सामन्यांमध्ये पाकिस्तानचा पराभव झाला आहे. पाकिस्तानकडे आता ४ पॉईंट्स जमा आहेत. तसेच त्यांची पीसीटी ८.३३ वरुण ६.६६ टक्क्यांवर घसरली आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संघ शेवटच्या स्थानावर आहे. त्यामुळे पुढील सामना पाकिस्तानला जिंकावाच लागणार आहे.

पाकिस्तानच्या संघाला च्या अंतिम सामन्यात प्रवेश करण्याचे स्वप्न आता जवळपास धुळीस मिळाले आहे. वेस्ट इंडिजचा ११ समन्यांमधील हा दुसरा विजय ठरला आहे. सध्या त्यांचा संघ आठव्या स्थानावर आहे. तर भारतीय संघ डब्लूटीसीच्या पॉईंट्स टेबलमध्ये पाचव्या स्थानावर आहे.

## रायगडच्या गुणवंत खेळाडूंना मिळणार आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा



### संधी मिळणार

या आधुनिक क्रीडा सुविधांमुळे रायगडमधील युवकांना अद्ययावत प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील, तळागाळातील क्रीडा प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळेल आणि विशेषतः महिला, मुले तसेच ग्रामीण व सुविधांपासून वंचित असलेल्या भागातील खेळाडूंचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढण्यास मोठी मदत होईल.

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड लोकसभा मतदारसंघातील क्रीडा पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि स्थानिक गुणवंत खेळाडूंना उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी मखेले इंडियाफ योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य द्यावे, अशी मागणी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय युवा विकास व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांची भेट घेऊन सविस्तर प्रस्तावासह निवेदन सादर केले.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक गुणवंत खेळाडूंमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची मोठी क्षमता आहे. मात्र, त्यासाठी दर्जेदार मैदाने, आधुनिक प्रशिक्षण सुविधा आणि आवश्यक क्रीडा पायाभूत व्यवस्था उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे.

ही गरज ओळखून मतदारसंघात बहुउद्देशीय इनडोअर हॉल, सिंथेटिक ॲथलेटिक ट्रॅक, फुटबॉल व हॉकी मैदाने, व्हॉलीबॉल व बास्केटबॉल कोर्ट, ओपन जिम, क्रीडा वसतिगृहे उभारणे तसेच अस्तित्वात असलेल्या क्रीडा सुविधांचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी केंद्र शासनाने सहकार्य करावे, अशी विनंती खासदार तटकरे यांनी केली.

यासंदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड यांनी तयार केलेला सविस्तर प्रस्तावही केंद्रीय मंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रतिभावान खेळाडूंना योग्य संधी आणि सुविधा मिळाल्यास ते निश्चितच राज्य आणि देशाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

खेळाडूंच्या स्वप्नांना सक्षम क्रीडा सुविधांची जोड देण्यासाठी केंद्रसरकारकडे सातत्याने पाठपुरावा करत राहणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**तैपेई ओपन बॅडमिंटन चषक** जपानच्या मिनोरू कोगाला हरवले

## एचएस प्रणयची विजयी सलामी




। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बॅडमिंटनपटू एचएस प्रणयने तैपेइ ओपनमध्ये शानदार सुरुवात केली आहे. सातव्या मानांकित प्रणयने बुधवारी जपानच्या मिनोरू कोगाला २१-११, २१-१४ असे हरवले. हा सामना ३५ मिनिटे चालला. पुढील फेरीत प्रणयचा सामना भारताच्या मिथुन मंजूनाथ आणि हाँग-काँगच्या जेसन गुनावन यांच्यातील सामन्याच्या विजेत्याशी होईल. प्रणय सध्या जागतिक क्रम वारीत ३६व्या स्थानावर आहे.

त्याने यापूर्वी वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे. चायपेला येण्यापूर्वी या वर्षी तो केवळ तीन वेळाच पहिल्या फेरीतून पुढे जाऊ शकला होता.

स्पर्धेच्या पहिल्या फेरीत इतर भारतीय खेळाडूंना पराभवाला सामोरे जावे लागले. पुरुष एकेरीत रौनक चौहानला सिंगापूरच्या रिची दूता रिचर्डोने २१-१४, २१-१६ असे हरवले. तर, महिला एकेरीत श्रियांशी वलीशेट्टीला थायलंडच्या सुपानिदा केथोंगने २१-११, २१-१२ असे हरवले.

### क्वार्टर फायनलच्या शोधात प्रणय

लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांच्या अनुपस्थितीत प्रणय तायपे ओपनमध्ये भारतीय पुरुष एकेरीच्या आव्हानाचे नेतृत्व करत आहेत. प्रणयने या वर्षी आतापर्यंत आठ स्पर्धा खेळल्या आहेत, पण कोणत्याही स्पर्धेत दुसऱ्या फेरीच्या पुढे जाऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत ते या स्पर्धेत आपल्या पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत स्थान

## वर्ल्ड कपमध्ये १७ खेळाडूंचा फॉर्म्युला?

**नवी दिल्ली :** आयसीसी विश्वचषक विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाचे मुख्य प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे अजब विनंती केली आहे. त्यांनी आगामी विश्वचषक स्पर्धेसाठी संघातील खेळाडूंची संख्या १५ वरून १७ पर्यंत वाढवण्याचे मत मांडले आहे. आयसीसी विश्वचषक २०२७ स्पर्धा दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे पार पडणार आहे. यासाठी आयसीसीने स्पर्धेच्या स्वरूपात बदल केला आहे. त्यावरून सामन्यांची संख्या वाढली नसली तरी, अव्वल संघांसाठी सामन्यांची संख्या मात्र वाढली आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)